सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १०४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १५ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## समुद्राचे खारट पाणी गोड करता येणार
## तटरक्षक दल, डीआरडीओच्या संशोधकांना मोठे यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ कानपूर**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था म्हणजेच डीआरडीओला मोठे यश मिळाले आहे. समुद्राच्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर करण्यात डीआरडीओच्या संशोधकांना यश आले आहे.




समुद्राचे खारे पाणी गोड्या पाण्यात रुपांतरीत करण्यासाठी नॅनोपोर्स मल्टीलेयर्ड पॉलिमर मेम्ब्रेनचा शोध लावण्यात आला आहे. समुद्राच्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर करण्याची ही एक पद्धत आहे. याचा फायदा पाण्याची टंचाई असलेल्या भागांसह तटरक्षक दलालाही होणार आहे. डीआरडीओला भारतीय तटरक्षक दलाचे साह्य लाभले आहे. कानपूरमध्ये स्थित असलेल्या डीआरडीओच्या डिफेन्स मटेरियल स्टोअर्स आणि रिसर्च अँड डेव्हलपमेंट लॅबमध्ये हे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. यामध्ये नॅनोपोर्स बहुस्तरीय पॉलिमर पडदा आहे, जो खारे पाणी शुद्ध करताना त्यातील खारट तत्वे बाजुला करतो. आठ महिन्यांच्या संशोधनातून हा पडदा तयार करण्यात यश आले आहे.

सध्या तटरक्षक दलाच्या जहाजांवर प्रायोगिक स्तरावर या मेम्ब्रेनचा वापर केला जात आहे. या चाचणीवेळी समाधानकारक निकाल मिळाले आहेत. असे असले तरी तटरक्षक दलाला या तंत्रज्ञानाच्या वापराला परवानगी मिळविण्यासाठी ५०० तासांच्या ऑपरेशनल चाचणीतून जावे लागणार आहे. सध्यातरी हे तंत्रज्ञान तटरक्षक दलापुरतेच केंद्रीत असले तरी भविष्यात भारतीय बोटींवर, खलाशांना समुद्रात पाणी पिण्यासाठी वापरता येण्याची शक्यता आहे. तसेच किनारी भागात राहणाऱ्या लोकांसाठी खूप फायदेशीर ठरू शकते. काही बदलांसह, समुद्रकिनाऱ्यावर राहणाऱ्या लोकांना गोड पाणी पुरवण्यासाठी देखील याचा वापर केला जाऊ शकतो.

**काय होते आव्हान**

भारतीय तटरक्षक दलाच्या जहाजांवर खाऱ्या पाण्यासाठी डिसॅलिनेशन प्लांट वापरले जातात. खाऱ्या पाण्यात असलेल्या क्लोराइड आयनमुळे या मेम्ब्रेनची स्थिरता कायम राखणे कठीण जाणार होते. डीआरडीओने या दिशेने नवीन संशोधन करून टिकाऊ मेम्ब्रेन विकसित केले आहे.

## डोळ्यावर पट्टी बांधून नेले, टॉर्चर केले
### पाकिस्तानातून परतलेल्या बीएसएफ जवानाची आपबीती शारीरिक आणि मानसिक छळही करण्यात आला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५ जम्मू**

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी बीएसएफ जवान पूर्णम कुमार शॉ अनावधानाने आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पाकिस्तानात पोहोचले. वीस दिवसांनंतर पाकिस्तानी रेंजर्सनी त्यांची सुटका केली आणि भारताच्या स्वाधीन केलं. आता पाकिस्तानमध्ये त्यांच्यासोबत नेमकं काय घडलं? किती क्रूरतेने वागलं गेलं हे आता पूर्णम कुमार शॉ यांनी सांगितलं आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बीएसएफ जवान पूर्णम कुमार शॉ हे पाकिस्तानच्या ताब्यात असताना त्यांच्यासोबत क्रूरपणे वागण्यात आलं. खूप त्रास सहन करावा लागला. त्यांना दात घासण्याची परवानगी नव्हती. त्यांना झोपू दिलं नाही. टॉर्चर केलं. त्यांचा फक्त शारीरिक छळ करण्यात आला नाही तर मानसिक छळही करण्यात आला. त्यांना तीन ठिकाणी नेण्यात आलं. विमानांच्या उडण्याचा आवाज ऐकू यावा




म्हणून त्यांना एअरबेसजवळही नेण्यात आलं.पूर्णम कुमार शॉ हे १६ वर्षांपासून बीएसएफमध्ये आहे. त्यांची नुकतीच फिरोजपूर येथे पोस्टिंग झाली होती. आयबीमध्ये नियुक्त असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबद्दलही त्यांची चौकशी करण्यात आली. बहुतेक वेळा त्याच्या डोळ्यावर पट्टी बांधून त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी नेलं जात असे. एका ठिकाणी त्यांना जेलमध्ये ठेवण्यात आलं होतं. त्यांना शिवीगाळ करण्यात आली.

## पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी धर्म विचारुन मारले; आम्ही त्यांचे कर्म पाहून त्यांना अद्दल घडवली - राजनाथ सिंह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५जम्मू-काश्मीर**

पाकिस्तानसोबतच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर जम्मू आणि काश्मीरमधील सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह श्रीनगरला पोहोचले आहेत. त्यांनी जवानांची भेट घेतली. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर आणि १० मे रोजी दोन्ही देशांमधील युद्धविरामानंतर संरक्षणमंत्र्यांचा हा पहिलाच जम्मू-काश्मीर दौरा आहे.




ऑपरेशन सिंदूर आणि भारतीय सैन्याचं राजनाथ सिंह यांनी भरभरून कौतुक केलं आहे. पहलगाममध्ये त्यांनी धर्म विचारून मारलं आणि आम्ही दहशतवाद्यांना, पाकिस्तानला त्यांचं कर्म पाहून अद्दल घडवली. मी जगाला विचारू इच्छितो की, अशा बेजबाबदार आणि दुष्ट राष्ट्राच्या हातात अण्वस्त्र सुरक्षित आहेत का? पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या सर्व निष्पाप नागरिकांना आणि 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान शहीद झालेल्या आपल्या जवानांना मी श्रद्धांजली अर्पण करतो असं केंद्रीय संरक्षण मंत्र्यांनी म्हटलं आहे.

मी आपल्या जखमी जवानांच्या धाडसालाही सलाम करतो आणि ते लवकर बरे व्हावेत अशी देवाकडे प्रार्थना करतो. शत्रूला नेस्तनाबूत केलं ती ऊर्जा अनुभवायला मी इथे आलो आहे. तुम्ही सीमेपलीकडे पाकिस्तानच्या चौक्या आणि बंकर ज्या परकारे उद्ध्वस्त केलं ते शत्रू कधीही विसरणार नाही. तुम्ही पाहिलं असेल की, लोक सहसा उत्साहात आपलं भान गमावतात परंतु तुम्ही तुमचा उत्साह तसाच कायम ठेवला आणि अचूक पद्धतीने शत्रूची ठिकाणं उद्ध्वस्त केली.

आज भारताचा दहशतवादाविरुद्धचा संकल्प किती मजबूत आहे हे आपण त्यांच्या न्यूक्लियर ब्लॅकमेलची पर्वा केलेली नाही यावरून समजलं. संपूर्ण जगाने पाहिलं आहे की पाकिस्तानने किती बेजबाबदारपणे भारताला अनेक वेळा धमकी दिली आहे असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

## ४ दिवसांच्या संघर्षात भारत ठरला वरचढ, पाकिस्तानला मोठं नुकसान; न्यूयॉर्क टाईम्सचा रिपोर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नवी दिल्ली**

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरमधूनपाकिस्तानात जोरदार हल्ला केला. त्यात अनेक दहशतवादी तळांना टार्गेट करण्यात आले. मात्र या हल्ल्याने बिथरलेल्या पाकिस्तानने भारताच्या सीमेवरील नागरी वस्त्यांवर भ्याड ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला. पाकचे हे हल्ले भारताच्या एअर डिफेन्स प्रणालीने हाणून पाडले परंतु या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारताने पाकच्या सैन्य एअरबेसवर हल्ले केले. त्यात पाकिस्तानचे प्रचंड मोठे नुकसान झाले. भारताच्या या हल्ल्यामुळे पाकिस्तानची पळता भुई थोडी झाली. या ४ दिवसांच्या संघर्षात पाकिस्तानी




सैन्य आणि एअरबेसला टार्गेट करण्यात भारताला यश आले असं अमेरिकेच्या न्यूयॉर्क टाईम्सच्या रिपोर्टमध्ये म्हटलं आहे. हायरिजॉल्यूशन सॅटेलाईट फोटोच्या सहाय्याने हा रिपोर्ट तयार केला आहे.

रिपोर्टनुसार, भारताचे हल्ले प्रभावी आणि चांगल्या प्रकारे लक्ष्यित होते. या हल्ल्यामुळे पाकिस्तानी सैन्य एअरबेसला मोठे नुकसान झाले. भारत-पाकिस्तानातील हा संघर्ष गेल्या ५० वर्षातील सर्वात मोठा होता. ज्यात ड्रोन आणि मिसाईलचा पुरेपूर उपयोग करण्यात आला. सॅटेलाईट फोटोत पाहिले तर हे हल्ले व्यापक होते, परंतु नुकसान दाव्याच्या तुलनेत मर्यादीत होते असं त्यात उल्लेख आहे.

**पाकिस्तानचे दावे पोकळ**

भारताच्या या हल्ल्याला पाकिस्तानी सैन्यानेही प्रत्युत्तर दिल्याचा दावा केला. पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या दाव्यानुसार, त्यांनी भारताच्या उधमपूर एअरबेसवर हल्ला केला परंतु १२ मे रोजी घेतलेल्या सॅटेलाईट फोटोत याचे काही पुरावे सापडत नाहीत. या एअरबेसवर कुठेही नुकसान झाले नसल्याचं दिसून येते. ४ दिवस चाललेल्या या संघर्षात १० मे रोजी भारत-पाकिस्तानात युद्धविराम करण्यावर सहमती झाली. या संपूर्ण प्रकरणी भारताच्या सैन्य कारवाईत पाकिस्तानच्या युद्धक्षमतेची पोलखोल झाली. ज्याची पुष्टी जागतिक माध्यमे, सॅटेलाईट डेटा करत आहेत.

### पोलीस हेड कॉन्स्टेबललाही गुन्ह्यांचा तपास करण्याचा अधिकार; राजपत्र जारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५मुंबई**

राज्यातील गुन्हेगारी सातत्याने वाढ होतानाचा चित्र पाहायला मिळत असून सध्य सायबर गुन्हेगारीचेही प्रमाण वाढले आहे. एकीकडे गुन्हेगारीत वाढ झाली असताना दुसरीकडे पोलिसांवरील ताण-तणाव आणि कामाचा अतिरिक्त भार वाढतच आहे. वाढत्या नागरिकरणावर आणि गुन्हेगारीच्या घटनांमुळे पोलीस यंत्रणा अपुरी पडत असून पोलीस खात्यात भरती करण्याची मागणीही गृहखात्याकडे केली जाते. दरम्यान, आता वाढत्या गुन्हेगारीच्या आणि अपुऱ्या पोलीस मनुष्यबळाच्या पार्श्वभूमीवर गृहखात्याने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या पोलिस दलातील अपुऱ्या मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता, गृहविभागाने पोलिस हेड कॉन्स्टेबललाही गुन्ह्यांचा तपास करण्याचे अधिकार दिले आहेत. यापूर्वी, केवळ पोलीस उपनिरीक्षक पदापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे हा अधिकार होता. आता, पोलीस वरिष्ठ हवालदार यांनादेखील गुन्ह्याचा तपास करता येणार आहे. मात्र, त्यासाठी काही अटी घालून देण्यात आलेल्या आहेत.

## जम्मू काश्मीरच्या त्रालमध्ये ३ दहशतवाद्यांना कंठस्नान, टॉप कमांडरचाही समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५जम्मू**

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ निष्पाप नागरिकांची हत्या केली. यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवाद्यांचे ११ तळे उद्ध्वस्त केली. त्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला. त्यानंतर दोन्ही देशांमध्ये शस्त्रसंधीची घोषणा करण्यात आली. पण आता भारतीय लष्कर देशात असलेल्या खासकरून जम्मू काश्मीरमध्ये असलेल्या दहशतवाद्यांविरोधात अनेक कारवाया करण्यास सुरुवात केली आहे. नुकतेच, जम्मू आणि काश्मीरच्या




अवंतीपोरा भागातील नादेर, त्राल येथे पोलीस दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. गुरुवारी (१५ मे) सकाळी सुरू झालेल्या या चकमकीत सुरक्षा दलांनी तीन दहशतवाद्यांना ठार केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जम्मू आणि काश्मीरमधील अवंतीपोरा येथील त्राल येथे सुरक्षा दलांनी तीन दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. यामध्ये एक टॉप कमांडर आसिफ शेखचा खात्मा करण्यात आला असून आमिर नजीर वाणी आणि अहमद भट्ट याचाही समावेश आहे. पहलगाम हल्ल्यानंतर सरकारने जाहीर केलेल्या १४ दहशतवाद्यांच्या यादीमध्ये या तिघांचाही समावेश होता. असे असले तरीही अधिकाऱ्यांनी अद्याप दहशतवाद्यांच्या मृत्यूची पुष्टी केलेली नाही. पण, गेल्या तीन दिवसांत जम्मू आणि काश्मीरमध्ये ही दुसरी चकमक आहे. याआधी १३ मे रोजी शोपियान जिल्ह्यातील केलर येथे सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत लष्कर-ए-तैयबाचे तीन दहशतवादी ठार झाले होते. बुधवारी केलरमधूनच शस्त्रांचा मोठा साठा जप्त करण्यात आला होता.

## 'गोपीचंद पडळकर यांच्या मिरवणुकीत झळकले लॉरेन्स बिश्नोईचे फलक', मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नाशिक**

भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नाशिकमधील मिरवणुकीत कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचे फलक झळकविण्यात आले होते. या प्रकराची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. पुण्यात माध्यमांशी बोलत असताना याबाबतचा प्रश्न फडणवीस यांना विचारण्यात



आला. त्यावर ते म्हणाले, आमदार गोपीचंद पडळकर यांच्याशी याबाबत बोलणे झाले असून पडळकर यांनी पोलिसांना याबाबतची माहिती द्यावी, असे सांगितले आहे. या प्रकारावर कठोर कारवाई करण्यास सांगितले आहे. लॉरेन्स बिश्नोई सारख्या गुंडाचे उदात्तीकरण सहन केले जाणार नाही. ज्यांनी फलक झळकवले त्यांच्यावर कारवाई होईलच.

**महापालिका निवडणुका वेळेतच होणार**

स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुका घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आलेल्या मुदतीबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, निवडणूक आयोगाने निवडणुकीची तयारी सुरू केलेली आहे. आम्ही वेळेत या निवडणुका घेण्याचा प्रयत्न करू. ज्या भागात पावसाचा जोर असेल त्या भागात निवडणूक काही दिवसांसाठी पुढे ढकलण्याची विनंती करू. याबाबत सरकार आणि निवडणूक आयोग योग्य तो समन्वय राखेल. पण वेळेत निवडणुका पूर्ण झाल्याच पाहिजेत, असा आमचा प्रयत्न असल्याचे हि मुख्यमंत्री म्हणालेत.

## सोफिया कुरेशींविषयी संतापजनक विधान करणाऱ्या शाहांना सरन्यायाधीश गवईंनी फटकारले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ नवी दिल्ली**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मध्य प्रदेश सरकारचे मंत्री विजय शाह यांनी भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबाबत वादग्रस्त विधान केलं. शाह यांनी कुरेशी यांचा उल्लेख दहशदवाद्यांची बहिण असा केला. या प्रकरणी आता सर्वोच्च न्यायालयाने शाह यांना फटकारले आहे. आज झालेल्या सुनावणीदरम्यान, सरन्यायाधीश भूषण गवई यांनी संविधानिक पदावरील व्यक्ती असं वक्तव्य कसं करू शकतो, असा थेट सवाल केला.



शाह यांनी कर्नल कुरेशी यांच्याविरुद्ध आक्षेपार्ह विधान केलं होतं. त्यानंतर मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली आणि डीजीपींना शाह यांच्याविरुद्ध चार तासांत एफआयआर नोंदवण्याचे निर्देश दिले होते. न्यायालयाच्या आदेशानुसार, बुधवारी संध्याकाळी शाह यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला. याला शाह यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीवेळी सरन्यायाधीशांनी मंत्री शाह यांची खरडपट्टी काढली. सरन्यायाधीश म्हणाले, तुम्हाला माहिती आहे तुम्ही कोण आहात? तुम्ही कोणत्या प्रकारचे विधान करत आहात? मंत्री असल्याने कसंही बोलणार का? ही कोणती भाषा आहे? असली वक्तव्ये मंत्र्याला शोभतात का?संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तीकडून असं वक्तव्य करू कसं शकतो, अशा शब्दात सरन्यायाधीश गवई यांनी फटकारल. तसंच पदावर असल्याने जबाबदारीने विधाने करावी, असंही म्हटलं.

## संपादकीय ......

# बलुचिस्तानचा स्वातंत्र्य लढा निर्णायक वळणावर; पाकिस्तानचे तुकडे अटळ

बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा करण्याबरोबरच बलोच लिबरेशन आर्मीने आपला स्वातंत्र लढा आणखी आक्रमक केला आहे. या लढ्याची परिणिती पाकिस्तानचे आणखी तुकडे पडण्यास होईल, अशीच चिन्हे दिसत आहेत.भारत आणि पाकिस्तान यांच्यात नुकतेच मिनी वॉर झाले. त्यात पाकिस्तानचा दारुण पराभव झाला. पाकला 'दे माय धरणी ठाय' झाले. आणखी काही काळ हा संघर्ष सुरू राहिला असता, तर बेबंदशाही निर्माण झालेल्या पाकिस्तानात यादवी उद्भवली असती. त्यामुळेच पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी अमेरिका, सौदी अरेबियाच्या नाकदुर्या काढून मध्यस्थी आणि शस्त्रसंधीसाठी गुडघे टेकले. एकीकडे हा संघर्ष चालू असतानाच बलोच लिबरेशन आर्मीने बलुचिस्तानचे स्वातंत्र्य जाहीर केलेच; पण एका दिवसात ३९ ठिकाणी हल्ले चढवून पाकिस्तानी लष्कराला सळो की पळो केले. भारत-पाकिस्तानमधील संघर्ष बलोच लिबरेशन आर्मीच्या पथ्यावरच पडला असून, त्याने या स्वातंत्र्यलढ्याला नवे वळण आणि बळ प्राप्त झाले आहे.

पाकिस्तानच्या निर्मितीवेळी बलुचिस्तान हा स्वतंत्र प्रांत होता आणि तत्कालीन बलुची नेत्यांची बलुचिस्तान स्वतंत्र व्हावा अशीच इच्छा होती. तथापि, पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी ती दडपून टाकली आणि १९४८ पासून बलुचिस्तानचा स्वातंत्र्य लढा सुरू आहे. हा लढा चिरडण्याचे शेकडो प्रयत्न पाकिस्तानी राज्यकर्ते आणि लष्कराने केले. तथापि, त्याला यश आले नाही आणि आता हा लढा निर्णायक वळणावर आला आहे. बलोच लिबरेशन आर्मीने बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणाच केली आहे आणि एक तृतीयांश बलुचिस्तान आपल्या कब्जात घेतला आहे. या वादळी लढ्याने पाकिस्तानचे आणखी तुकडे होणार, हे आता अटळ भवितव्य आहे.

२०१६ सालच्या स्वातंत्र्य दिन सोहळ्यात लाल किल्ल्यावरून बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बलुचिस्तानमधील लढ्याचा उल्लेख केला होता. मोदी यांच्या विधानाने पाकचा तिळपापड उडाला. तथापि, काश्मीरमध्ये पाकिस्तानच्या ज्या फुटीरवादी कारवाया चालतात, त्यांना मोदी यांच्या विधानाने चपराकच बसली आहे. मोदी यांच्या विधानाने बलुचिस्तानचा प्रश्न जागतिक व्यासपीठावर आला.

फाळणीपूर्वी बलुचिस्तान भारताचाच भाग होता. ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य दिले, तेव्हाच बलुचिस्तानमध्ये १२ ऑगस्ट १९४७ रोजी अहमदयार खान याने बलुचिस्तानचे स्वातंत्र्य जाहीर केले. तेव्हाच्या संस्थान खात्याचे मंत्री वल्लभभाई पटेल यांच्याकडे कलात संस्थानच्या नवाबने स्वतंत्र राहण्याची इच्छा व्यक्त केली होती. बलुचिस्तान पाकिस्तानात गेला. मेजर जनरल अकबरखान याने १९४८ च्या मार्च महिन्यात स्वातंत्र्याची ही चिंगारी लष्करी बळावर चिरडून टाकली. तथापि, लढवय्या बलुचींच्या मनातील स्वातंत्र्याची ज्योत विझली नाही.

१९५८-५९, १९६२-६३, १९७३-७४ या काळात हा संघर्ष अतिशय तीव्र झाला होता. बलुची स्वातंत्र्यवादी आणि पाकिस्तानी लष्कर यांच्यात सातत्याने चकमकी होत होत्या. १९७३ मध्ये भुत्तो यांची राजवट होती. त्यांनी अमानुषपणे लष्करी कायद्याचा अंमल जारी केला. त्यात नऊ हजार बलुचींचे शिरकाण करण्यात आले.

# संघर्षाची प्रतीक मूर्तीः गंगाधरराव राणा यांची कष्ट, श्रद्धा आणि साधेपणाची जीवनगाथा



एका अत्यंत साध्या, पण तेजस्वी जीवनाची ही प्रेरणादायी कहाणी आहे - श्री गंगाधरराव नारायणराव राणा यांची. १५ मे १९५० रोजी जन्मलेल्या गंगाधरराव राणा यांचे जीवन म्हणजे कष्ट, निष्ठा, आणि साधेपणाचा एक अमोघ संगम आहे. १५ मे २०२५ रोजी ते आपल्या आयुष्यातील पंच्याहत्तरी (७५ वर्षे) पूर्ण करत आहेत. हे केवळ एका कुटुंबाचे आधारस्तंभ नाही, तर त्यांनी केलेला संघर्ष आणि जीवनमूल्ये ही आजच्या आणि पुढच्या पिढ्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरावी अशी आहेत.अत्यंत गरिबीमध्ये, अमरावती शहरातील तारखेडा येथील भाजीबाजारात भाड्याच्या घरात राहणाऱ्या नारायणराव राणा यांचे हे थोर सुपुत्र. अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत अंगावर गोण्या वाहून मजुरी करत त्यांनी घर चालवले. याच कालखंडात त्यांनी सायकलवरून घराघरातून बारदाना (जाड कापडी गोण्या) जमा करून विकण्याचा व्यवसाय सुरू केला. आठवड्याला फक्त १०० रुपये मिळत असताना देखील त्यांनी आपल्या चारही मुलांना - सुनील, माधुरी, रवी आणि अंजली यांना शिकवायचा निर्धार केला आणि कधीही शिक्षणावर तडजोड केली नाही.त्यांचा जीवनशैली ही अत्यंत शिस्तबद्ध आणि अध्यात्मिक होती. रामभक्त हनुमानावर नितांत श्रद्धा असलेल्या गंगाधररावांचे दररोजचे नित्यकर्म म्हणजे - स्नान करून कल मारुती मंदिरात एक लोटा पाणी वाहणे, सूर्याला अर्घ्य देणे आणि भोग अर्पण करणे.प्रवीण नगर, हरिओम कॉलनी आणि शेवटी संताजी नगर अशा ठिकाणी भाड्याच्या घरातून स्थलांतर करत असताना त्यांनी कुटुंबाच्या सुख-दुःखाला कधीही पाठ फिरवली नाही. त्यांच्या मुलांनी त्यांच्या संघर्षातून प्रेरणा घेतली - रवी राणा यांनी सार्वजनिक कार्यक्रमात पाणी वाटप, स्टेज उभारणे यांसारखी कामं करत स्वतःला घडवले; सुनील राणा यांनी एसटीडी पीसीओमध्ये काम करून कुटुंबाला हातभार लावला.शेवटी शंकर नगर येथे आपल्या हातांनी बांधलेल्या एका छोट्याशा घरातून राणा कुटुंबाची नवी वाटचाल सुरू झाली. समाजसेवेचा वसा घेत आमदार रवी राणा यांनी जनतेच्या मनात आपले स्थान निर्माण केले. आजही अनेक जुने सहकारी अभिमानाने सांगतात - आमच्या सोबत मजूरी करणारा आणि बारदाना विकणाऱ्या गंगाधररावांचा मुलगा आमचा आमदार आहे! ही त्यांच्या जीवनातील खऱ्या संपत्तीची साक्ष आहे.

१५ मे २०२५ रोजी, गंगा-सावित्री फार्म हाऊस, गोविंदपूर येथे सायंकाळी ६ वाजता होणारा 'अमृत महोत्सव' हा केवळ वाढदिवस नव्हे, तर एका संघर्षशील युगपुरुषाला मानवंदना देण्याचा क्षण आहे - त्याच्या त्याग, साधेपणा, श्रद्धा आणि कुटुंबप्रेमाला साश्रू नमन.

**लेखक - बबन रडके ,**
**माजी नगरसेवक**

# जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती,**अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील प्रवेश निश्चित झालेलल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे, परंतु विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत, अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास दि. २ मे २०२५च्या शासन निर्णयानुसार तीन महिन्यांचा कालावधी मिळणार आहे.विद्यार्थ्यांनी या अधिकच्या मुदतीचा लाभ घ्यावा.

एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी परिपूर्ण अर्ज सादर करावेत. तसेच अर्ज त्रुटीत असल्यास त्रुटीची पूर्तता करावी, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त जया राऊत यांनी केले आहे.




# पावसाळ्यात वाढतो फंगल इंफेक्शनचा धोका, जाणा कारण

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**

पावसाळा म्हणजे हवामानात बदल, दमटपणा आणि ओलसर वातावरणअशा काळात शरीरातील स्वच्छता राखणे अत्यंत आवश्यक ठरते. विशेषतः पायांची काळजी घेतली नाही, तर फंगल इंफेक्शनचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढतो. पावसाळ्यात पाय ओले होणे, दलदलीत अडकणे, चप्पलमधून पाणी आत घुसणे ही समस्या अगदी सामान्य असते. पण यामधून फंगल इंफेक्शनचा धोका उद्भवतो.

फंगल इंफेक्शनपासून बचाव करण्यासाठी हे ५ सोपे उपाय

१. पाय नेहमी कोरडे ठेवा

पावसात बाहेरून आल्यावर पाय नीट धुऊन टॉवेलने कोरडे करावेत. विशेषतः बोटांमधील जागा सुकवणे खूप गरजेचे आहे. ओलसरपणामुळे बुरशी वाढते आणि संसर्ग वाढतो.

२. पावसाळी चप्पल किंवा सँडल वापरा

पायांमध्ये हवा खेळती राहावी म्हणून ओपन सँडल किंवा चप्पल वापरणे योग्य. बंद बूट किंवा शूजमुळे ओलसरपणा कायम राहतो, जो फंगल इन्फेक्शनसाठी पोषक ठरतो.

३. एंटिफंगल पावडरचा वापर करा

बाहेर पडण्यापूर्वी आणि रात्री झोपताना पायावर एंटिफंगल पावडर किंवा स्प्रे वापरल्यास फंगसचा धोका कमी होतो.

४. ओले मोजे किंवा चप्पलाचा वापर टाळा

पाय ओले झाल्यानंतर तेवढेच मोजे पुन्हा वापरणे टाळा. ओले मोजे फंगल इंफेक्शनचे मुख्य कारण ठरतात. स्वच्छ, कोरडे आणि



कॉटनचे मोजे वापरा.

५. पायांची स्वच्छता राखा आणि वेळोवेळी स्क्रब करा

दर आठवड्याला एकदा पायांना स्क्रब किंवा क्लीनिंग करणे आवश्यक आहे. टाचा, नखांखालची घाण काढल्याने संक्रमणाचा धोका कमी होतो.जर फंगल इंफेक्शनची लक्षणे दिसू लागली (खाज, लालसरपणा, वास, पुरळ), तर लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्या. कोणताही क्रीम किंवा घरगुती उपाय स्वतः वापरणे टाळा, कारण चुकीचा उपचार संसर्ग वाढवू शकतो.

पावसाळ्यात पायांची योग्य काळजी घेणे ही गरज आहे, फक्त शोभेसाठी नाही तर आरोग्यासाठी. स्वच्छता, कोरडेपणा आणि योग्य चप्पलाचा वापर करून आपण फंगल इंफेक्शनपासून स्वतःचे रक्षण करू शकतो.

# यंदाही गोदावरी तुरीचे भरघोस उत्पादन घ्यायचंय, 'या' गोष्टी समजून घ्या!

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत जालना जिल्ह्यातील बदनापूर कृषि संशोधन केंद्राने तूर, मूग, उडीद आणि हरभरा आदी पिकाचे अनेक चांगले वाण निर्मित केलेली आहेत. मागील खरीप हंगामात वर्ष २०२४ मध्ये या वाणाचे अतिशय दर्जेदार असे उत्पादन निघाले.

गोदावरीम्हणजेच बीडीएन २०१३ -४१ आहे. या वाणाचे दाणे पांढऱ्या रंगाची आहे. या वाणाचा कालावधी हा साधारण १७० दिवसाचा आहे. त्यामुळे हमखास पाणी देण्याची व्यवस्था असेल तरच शेतकऱ्यांनी या वाणाची निवड करावी. कारण तूर पिकाची गुंडी अवस्था ते शेंगांत दाणे भरणे हा कालावधी महत्वाचा असतो. या कालावधीत पिक संरक्षण आणि पाणी व्यवस्थापन फार महत्वाचे असते.

**लागवडीसाठी अंतर किती असावे ?**

दोन ओळीतील अंतर चार फूट आणि रोपातील अंतर दीड फूट असावे. पण अनेक शेतकरी यापेक्षा जास्त अंतरावर लागवड करतात.

काही शेतकऱ्यांनी दोन ओळीतील अंतर आठ फूट ठेवतमध्ये मूग, उडीद आणि सोयाबीन या पैकी एक पिकाची निवड करत आंतरपीक घेतले.

लागवडीचे अंतर निश्चित करताना शेतकरी बांधवांनी आपली जमिनीची प्रत, पाणी व्यवस्थापन या बाबी विचारात घ्याव्यात.

**गोदावरी तूर लागवड तंत्रज्ञान**

बियाणे टोकन पद्धतीने एकरी २ किलो

लागवड करण्यापूर्वी बीज प्रक्रिया महत्वाची

एफआयआर म्हणजे बीज प्रकिया करतेवेळी प्रथम बुरशीनाशक वापरावे. नंतर कीटकनाशक वापरावे आणि यानंतर अर्धा तासाने सावलीत जैविक बुरशी नाशक वापरावे.

यात बहुतेक बियाणांची रासायनिक बीज प्रकिया ही कृषि विद्यापीठातील बीज प्रकिया केंद्रात बियाणे प्रकिया करतेवेळी झालेली असते.

आपण सर्वांनी जैविकमध्ये ट्रायकोड्रमा आणि रायझोबियम जिवाणू संवर्धन हे मात्र बियाणे पेरतेवेळी सावलीत प्रति किलो बियाण्यास १० मिली या प्रमाणे प्रक्रिया करत पेरणी करावी.

**जैविक बुरशी नाशक ही कृषि विद्यापीठात उपलब्ध आहेत**

खताची मात्रा : या पिकासाठी हेक्टरी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद शिफारस आहे. थोडक्यात अडीच एकर क्षेत्रासाठी १०० किलो डायअमोनियम फॉस्फेट म्हणजेच वरहि खत पेरतेवेळी पेरून द्यावे. या पिकास गंधक खताची फार गरज असते. दाण्यावर चकाकी आणि आकार आणि गुणवत्ता वाढ करण्यास गंधक उपयुक्त ठरते.

**आंतरपिकाबाबत महत्वाचे....**

आंतरपीक पद्धतीत एक काळजी अवश्य घेणे गरजेचे ठरते.

बरेच शेतकरी हे तूर पिकाच्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**कृषी विशेष**

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

ओळीला लगत एक फुटावर सोयाबीन सारखे आंतरपीक घेतात.

यामुळे सोयाबीन पीक झपाट्याने वाढत मुख्य पीक तुरीला दाबून टाकते.

त्यामुळे आंतरपीक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी आपले मुख्य पिक तूर दोन सोयाबीन ओळीच्या कचाट्यात सापडणार नाही, याची खबरदारी घेतली पाहिजे.

**या गोष्टीही लक्षात ठेवा....**

काही शेतकरी बेड पद्धतीने तूर




लागवड करतात. समजा पाऊस जास्त झाला तर पिकाचे नुकसान होत नाही. जास्तीचे पाणी शेताबाहेर जाण्यास मदत होते. पाऊस कमी असेल तर पडलेला पाऊस सरीत जिरवला जातो.

लागवड करतेवेळी पक्षी थांबा म्हणून मका अथवा ज्वारी पिकाची दाणे अल्प प्रमाणात असावी.

ज्यामुळे नैसर्गिक पक्षी थांबे होऊन पक्षी पिकावरील अळ्या खातील, ही ताटे उभीच ठेवायची, काढायची नाही.

**गोदावरी वान हा मर व वांझ रोग प्रतिबंधक आहे.**

महत्वाचे म्हणजे जुलै आणि ऑगस्ट महिन्यात तूर पिकास ट्रायकोडर्मा या जैविक बुरशी नाशकाची आळवणी केली पाहिजे.

**पिकास पाणी कधी द्यावे ?**

पीक गुंडी अवस्थेत असेल आणि पाण्याची गरज असेल अशा वेळी पिकास पाणी द्यावे

आणि पीक संरक्षण देखील याच पीक अवस्थेत करणे गरजेचे असते.

पहिली फवारणी ही निंबोळी अर्क करावी.

यासाठी शेताच्या बांधावरील निंबोळी येत्या जून महिन्यात जमा करून ठेवावी.

अशा प्रकारे तूर पिकाचे पेरणी नियोजन नक्कीच उपयुक्त ठरेल.

**- डॉ सूर्यकांत पवार, विस्तार कृषि विद्यावेता**

- रामेश्वर ठोंबरे, विभागीय कृषी विस्तार शिक्षण केंद्र, छत्रपती संभाजी नगर.

# नवउद्योजकांना दुबईत उत्पादने निर्यातीसाठी मार्गदर्शन करणार : धनंजय दातार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती** - मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी महाराष्ट्रातील नवउद्योजकांची उत्पादने दुबईसह संयुक्त अरब अमिरातीत निर्यात करण्यासाठी मदतीची तयारी दाखवली आहे. दुबईच्या उंबरठ्यावरुन जागतिक बाजारपेठेत व्यवसाय वाढवण्यास इच्छुक असलेल्यांना मनापासून मार्गदर्शन करणार असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

भारतातून दुबईत उत्पादने निर्यात करण्यासाठीची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, कायदेशीर तरतुदी, दर्जा व पॅकेजिंगसंबंधी नियम तसेच व्यवसायाचे विपणन करताना घ्यायची काळजी अशा विविध पैलूंवर दातार यांनी युवकांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, भारतातून आखाती



देशांत विशेषतः संयुक्त अरब अमिरातीत होणारी निर्यात मुख्यतः सागरी वाहतुकीद्वारे होते आणि ती स्वस्त असते. मात्र या प्रवासाला साधारणतः २० दिवस लागत असल्याने शेल्फ लाईफ अत्यल्प असलेली नाशवंत उत्पादने विचारात घेऊ नयेत. किमान सहा महिने ते वर्षभर टिकणारी उत्पादने निवडावीत. आम्ही आमच्या सुपर स्टोअर्सच्या साखळीद्वारे आखाती बाजारपेठेत शुद्ध, स्वच्छ व अस्सल उत्पादने पुरवतो. हल्ली सेंद्रीय उत्पादनांवर ग्राहकांचा विशेष भर आहे. उत्पादनांचे पॅकेंजिग सुरक्षित व टॅम्परप्रूफ असावे. आम्ही आमच्या पिकॉक ब्रँडअंतर्गत अलिकडे पौष्टिक खपली गहू सादर केला. त्याला येथील ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्याच धर्तीवर नैसर्गिक, रसायनमुक्त, भेसळमुक्त व आरोग्यदायी कृषिउत्पादने व खाद्यउत्पादने पाठवल्यास उत्पादकांनाही समाधानकारक आर्थिक फायदा मिळेल.भेसळ, ग्राहकांचे नुकसान, फसवणूक किंवा अनारोग्यकारक उत्पादनांबाबत आखाती देशांचे धोरण व कायदे कडक असल्याने निर्यातदाराने काटेकोर राहण्याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सूचित केले.या शिष्टमंडळात आमदार देशमुख यांच्याखेरीज सोलापूर गार्मेन्ट्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे संचालक अमित जैन, उद्यम पीएएचएसयूआय फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेश गुराणी, अल्पेश संकलेचा, विजय पाटील, यश जैन, प्रदीप जैन, आनंद झाड आणि चंद्रशेखर जाधव आदींचा समावेश होता.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १५ मे २०२५

शहर/ग्रामिण




# मेळघाटातील पाणीटंचाई निवारणासाठी जलसंधारणाची कामे

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती –** मेळघाटातील पाणीटंचाई निवारणासाठी विविध गावांमध्ये पाणीटंचाई उपाययोजना, नरेगा आणि सिंचन विभागातर्फे जलसंधारणाची कामे आणि पाणी पुरवठ्याची कामे करण्यात येत आहे. या कामांची जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी मंगळवार, दि. १३ मे रोजी पाहणी केली.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, कार्यकारी अभियंता सुनिल जाधव, गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकळे, नायब तहसीलदार श्री. धावडे, सहायक गटविकास अधिकारी महेश वाढई, ग्रामिण पाणी पुरवठा उप अभियंता श्री. खाटकर, सिंचन उप अभियंता श्री. राठोड, उप अभियंता मोहिनी धांडे उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी चिखलदरा तालुक्यातील विविध गावांमध्ये सुरू असलेली पाणीटंचाईची कामे, रोजगार हमी योजना आणि सिंचन विभागाची जलसंधारणाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे, तेंदूपत्ता संकलन आणि टेंब्रुसोंडा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे भेट दिली.बोराळा येथे नरेगा अंतर्गत जलशोषक चर आणि घरकुल, चांदपूर येथे नरेगाच्या सुरू असलेल्या कामास भेट आणि मजुरांसोबत चर्चा केली. बहादरपूर येथे सिंचन विभागाच्या साठवण बंधाऱ्याची पाहणी, तसेच टँकरची माहिती घेतली. धरमडोह येथील गावाने पाणीटंचाईवर पेसा आणि स्वनिधीच्या मदतीने मात करून नियमित लागणारे टँकर बंद केले आहे. त्याबाबत भेट देऊन सरपंच, सचिव आणि नागरिकांशी संवाद साधला.टेंब्रूसोंडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र येथे भेट देऊन पाहणी. यावेळी प्रस्तावित ग्रामीण रूग्णालयाच्या जागेबाबत चर्चा व मार्गदर्शन केले. कुलंगणा खुर्द येथे पाणीटंचाई अंतर्गत केलेल्या उपाययोजनेच्या कामास भेट देऊन सरपंच, उपसरपंच आणि नागरिकांशी संवाद साधला. सोमवारखेडा आणि मलकापूर येथील कोल्हापुरी बंधारा कामाची पाहणी केली. त्यानंतर बागलिंगा आणि १४ गावे या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जल प्रक्रिया केंद्राच्या कामास भेट दिली. तसेच हिरदामल येथे ग्रुप ऑफ ग्रामसंघातर्फे सुरू असलेल्या तेंदूपत्ता संकलन फळीला भेट देऊन श्री. जामकर यांच्याशी चर्चा केली.

# मान्सूनमधील आपत्तीत एकही मृत्यू होऊ नये– जिल्हाधिकारी सौरभ कटियार

## मान्सूनपूर्व उपाययोजनांचा आढावा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती –** यावर्षी मान्सून ७ जून रोजी दाखल होणार आहे. त्यामुळे मान्सून कालावधीतील उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे. येत्या मान्सूनमध्ये आपत्तीत एकही मृत्यू होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात आज मान्सूनपूर्व उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दाणेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, ज्ञानेश्वर घ्यार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले, मान्सूनपूर्वी करावयाच्या उपाययोजनांसाठी तीन आठवड्यांचा कालावधी आहे. या काळात पूर परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा उपलब्ध करून घेण्यावर भर देण्यात यावा. पूर आल्यास नागरिकांना स्थानांतरीत करावे लागते. यासाठी तात्पुरते निवारे बांधण्यात यावेत.आवश्यकता भासल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव देऊन आवश्यक ती सामुग्री तयार ठेवावी. प्रामुख्याने पूर परिस्थितीत बचाव पथकांचे कार्य महत्वाचे असते. त्यांनी तातडीने प्रतिसाद देऊन कार्यवाही करावी. बचाव कार्यासाठी आवश्यक असलेले बोटी, लाईफ जॅकेट यांची देखभाल दुरूस्ती करावी. तसेच सराव करण्यात यावा. आपत्तीचे नियोजन करताना त्या परिसरातील स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात यावी.मान्सून कालावधीत साथीचे आजार पसरण्याचा धोका असतो. त्यामुळे औषधसाठा आणि प्राथमिक आरोग्य केंद्र सुस्थितीत ठेवण्यात यावेत. जनावरांनाही जलजन्य आजार होत असल्याने औषधे, लसींचा साठा तयार ठेवण्यात यावा. प्रामुख्याने मेळघाटात संपर्क तुटण्याची समस्या जाणवते. त्यामुळे झाडे पडणे, वीज तारा तुटणे, पुलावरून पाणी वाहण्याच्या काळात तातडीने प्रतिसाद देण्यात यावा.आपत्तीचा सामना करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. सतर्क राहून कार्य केल्यास आपत्तीमध्ये होणारी हाणी कमी होण्यास मदत मिळेल. मागील मान्सूनच्या कालावधीत आलेल्या अडचणीच्या परिस्थितीची माहिती घेऊन यावेळी त्यावर विशेष लक्ष ठेवण्यात यावे. शिकस्त इमारती कोसळल्यास अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवण्यात यावी. नुकसान झालेल्याचा पंचनामा तातडीने करण्यात यावा. याबाबतची माहिती तातडीने देण्यात यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

# बोगस बियाणे विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कडक कार्यवाही करा



## भाजपा किसान मोर्चा आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती** लवकरच पावसाळा लागणार असून खरीप हंगाम सुरू होत आहे शेतकऱ्यांनी बियाणे , खते घेण्यासाठी धावपळ सुरू केली आहे काही परवाना धारक बियाणे ,औषधी विक्रेता ज्या बियाण्यांची मागणी असेल ते न देता ज्यात जास्त फायदा मिळेल तेच बियाणे शेतकऱ्यांना देतात , जास्त भावाने विक्री करणारे त्यांच्यावर विशेष लक्ष देणे तसेच बोगस बियाणे विक्रेतावर कडक कार्यावाहि करून फौजदारी गुन्हे दाखल करणे तसेच तालुकास्तरीय भरारी पथकाचि स्थापना करणे यासाठी भाजपा किसान मोर्चा शहरजिल्हा अध्यक्ष मिलिंद बांबल यांनी निवेदन दिले त्यांच्या निवेदनाची प्रशासनाने घेतली गंभीर दखल यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी घेतली प्रशासनातर्फे शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध योजनेचि माहिती जनजागृती अभियान राबवून गावागावात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवन्यात येणार असल्याचे सांगितले तसेच बोगस बियाणे , खते , कीटकनाशके आणी जास्त भावाने विक्री करनाऱ्या दुकांनदारावर ( विक्रेता ) कडक कार्यवाही करण्यासाठी कृषी विभागातर्फे भरारी पथक स्थापन्यात आले आहे त्यांचे नाव , पद आणि मोबाईल नंबर प्रशासना तर्फे जाहीर करण्यात आले शेतकऱ्यांना काही तक्रारी असल्यास संपर्क करण्याचे आवाहन सुद्धा करण्यात आले यावेळी जिल्हाअध्यक्ष मिलिंद बांबल सोबत सरचिटणीस राजेश गोफणे , दीपक अनासाने , अविनाश मालोदे , संतोष कावरे,श्रीकांत धानोरकर , दिलीप करुले , ,मनोज देशमुख , मुकेश बळोणे , सुनील मालोदे ,देव महाराज , संजय बांबल , संजय कावळे , सचिन आलाटकरआदी पदाधिकारी उपस्थित होते. बोगस बियाणे ,खते तसेच जास्त भावाने बियाणे , खते , औषधी विकणार्या कृषी केंद्र मालकाला , दुकानदाराला आक्रमक पध्दतीने धडा शिकविण्यात येइल असा ईशारा भाजपा किसान मोर्चा अध्यक्ष मिलिंद बांबल यांनी दिला.

**या मो.क्रमांकावर सपंर्क करावा** –जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते ( मो.न – ७५८८०८४७४९) मल्ला तोडकर ( पथक प्रमुख ) मोन. ९८९०२११५७४ , प्रवीण खर्चे ( मोहीम अधिकारी ) मोन. ९४२२१९३१११ , ९४२२७३५९२० . अनिल तोटे ( उपनियंत्रक ) मोन. ९४२३४२५११५ , विराज देशमुख ( सदस्य सचिव ) मोन.७२१९३०८९७७

# सफाई कर्मचाऱ्यांना सर्व सुविधा पुरवाव्यात

## – आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१४अमरावती** विविध आस्थापनांवर सफाई कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांच्याकडून स्वच्छतेचे काम करून त्यांना असलेल्या सर्व सुविधा पुरवाव्यात, असे आवाहन राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी केले.जिल्हाधिकारी कार्यालयात आज मैला उचलणाऱ्या आणि गटार साफ करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यास प्रतिबंध व पुनर्वसन, तसेच अधिनियम २०१३ च्या अंमलबजावणी व सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या आणि त्यावर तोडगा काढण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव यांच्यासह संस्था आणि संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.श्री. डागोर यांनी सफाई कामगारांच्या निवासस्थानाबाबत संबंधित कर्मचाऱ्यांची २५ वर्षे सेवा झाल्यानंतर त्यांना पट्टेवाटप, त्यावरील घरकूल याचा प्रस्ताव शासनास सादर करावा. तसेच श्रम श्राफल्य योजनेतून घर बांधण्यासाठी सहकार्य करण्यात यावे. जिल्ह्यात या कर्मचाऱ्यांना आवाससाठी अंमलबजावणी करावी. यातील कोणतेही प्रकरण प्रलंबित राहू नये. याबाबत १ महिन्याच्या आत कार्यवाही करावी. निवासस्थाना सोबतच कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर आहे. त्यांची वैद्यकीय तपासणी नियमित करण्यात यावी. यासाठी शिबीरे आयोजित करावेत.इतर कर्मचाऱ्यांप्रमाणेच सफाई कामगारांनाही नियम लागू आहेत. आजाराच्या उपचाराची प्रतिपूर्ती देण्यात यावी. त्यांना आयुष्मान योजनाही लागू असल्याने त्यांचे कार्ड काढण्यात यावेत. तसेच कॅशलेस सुविधा उपलब्ध होण्यासाठी विमा कंपन्यांशी चर्चा करावी. कर्मचाऱ्यांना आठवडी सुट्टी देण्यात यावी. कर्मचारी निवृत्त किंवा मृत झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना विनाविलंब सर्व लाभ देण्यात यावेत. आदिवासी विकास विभागातील धारणी येथील कर्मचाऱ्यांची दहा वर्षे सेवा होऊनही कायम करण्यात आलेले नसल्याने याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश श्री. डागोर यांनी दिले.–

# दारूच्या वादातून दगडाने ठेचून युवकाची हत्या

## तीन तासात ६० वर्षीय संशयीत आरोपीला अटक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५ अमरावती–** दारू पिण्याच्या कारणावरून वाद उफाळला असता एका ६० वर्षाच्या म्हाताऱ्याने मध्यरात्री शेजारी राहणाऱ्या –३५ वर्षीय युवकाची दगडाने ठेचून हत्या केली.

तसेच पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह गाव शिवारातील तलावात फेकून दिला. मोर्शी–तालुक्यातील शिरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या काटपुर गावात बुधवारच्या मध्यरात्री ही धक्कादायक घटना घडली. घटनेनंतर शिरखेडचे ठाणेदार पीआय सचिन लुले पाटील यांनी तातडीने तपासाची सुत्रे हलवित संशयीत आरोपीला अटककेली.

राहुल रामदास इंगळे असे मृतकचे नाव आहे. तर अटकेतील संशयीत आरोपीचे नाव शंकरलाल पंजाबराव डोंगरे असे आहे.१४ मे रोजी सकाळी गावा लगतच्या तलावाच्या काळावर राहुल इंगळेचा छिन्न–विच्छिन्न मृतदेह काही गावकऱ्यांना दिसल्याने चांगलीचखळबळ उडाली. याबाबत तात्काळशिरखेड पोलिसांना माहिती देण्यात आली. शिरखेड पोलिस ठाण्याचे ठाणेदार सचिन लुले व एसडीपीओ संतोष खांडेकर तात्काळ ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. तसेच येथे श्वान पथक, ठसे तज्ज्ञ व फॉरेन्सीक टीमला सुध्दा प्राचारण करण्यात आले.

पोलिसांनी तातडीने तपासाची सुत्रे हलविली. दरम्यान मृतक राहुल हा मजूरीचे काम करित असून त्याला दारू पिण्याचे प्रचंड व्यसन जडले होते. दारूच्या कारणावरून राहुल व शंकरलाल यांच्यामध्ये सतत वाद होत होते, अशीगोपनीय माहिती मिळताच पोलिसांनी संशयाच्या आधारावर शंकरलाल डोंगरेला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली. सुरूवातीला शंकरलालने उडवा–उडवीची उत्तरे दिली. परंतु, पोलिसांचा खाक्या मिळताच शंकरलालने राहुलवर आधी काठीने वार करून त्याला मरणासुन्न केले आणि नंतर त्याच्या डोक्यात दगडाने वार करून त्याची हत्या केल्याची कबूली दिली. त्यानुसार पोलिसांनी शंकरलालला अटक केली. पोलिसांनी दिगंबर रामदास इंगळे याच्या तक्रारीवरून शंकरलाल विरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास ठाणेदार सचिनलुले, एपीआय राहुल गवई, पीएसआय स्वप्निल रणखांब, एएसआय प्रकाश बिरोले, हेड कॉन्स्टेबल मनोज कळसकर, संजय वाघमारे, गजूभाऊ तिजारे, खुपीया वैभव घोगरे, मयूर कापडे, पंकज चौधरी, धीरज डोंगरे, अश्विन फरतोडे तपास करीत आहे.

# ‘शक्ती’ चक्रीवादळ निर्माण होण्याची शक्यता

## पुढील तीन दिवस या ठिकाणी जोरदार पाऊस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५नवी दिल्ली:** बंगालच्या उपसागराच्या दक्षिणेकडील काही भागात, अंदमान समुद्राच्या दक्षिणेकडील भाग, निकोबार बेटे आणि अंदमान समुद्राच्या उत्तर भागातून नैर्ऋत्य मान्सून दाखल झाला आहे.

अशातच बंगालच्या उपसागरात २३ मे ते २८ मेदरम्यान प्रचंड वेगाने चक्रीवादळ निर्माण होऊ शकते.



संभाव्य चक्रीवादळाचे नाव शक्ती असे असेल. १६ ते १८ मे दरम्यान बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊ शकते,

पावसाची कधी आणि कुठे शक्यता?

हवामान विभागाने १६ मे पर्यंत कर्नाटकातील अनेक जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे.

कर्नाटकात अनेक ठिकाणी मान्सूनपूर्व सरी कोसळण्याची शक्यता आहे.

तसेच, पुढील २४ तासांसाठी कोलकात्यात संध्याकाळी गडगडाटासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे.

१३ आणि १४ मेदरम्यान गुजरात, कोकण आणि गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, छत्तीसगड, पश्चिम बंगाल आणि सिक्कीम, अंतर्गत कर्नाटकात; तामिळनाडू, पश्चिम बंगाल, झारखंड, केरळ, पुद्दुचेरी, कराईकल, रायलसीमा, आंध प्रदेशातील किनारी भाग आणि यानम येथेही हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

# तिवसा शहरातील वरातीत घडला प्रकार

## नवरदेव टाकून घोड्याची धूम.....!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५तिवसा–** भर वरातीत नवरदेवाला टाकून घोडा सुसाट पळाल्याचा हास्यस्पद प्रकार १३ मे रोजी रात्री नऊ वाजता दरम्यान तिवसा शहरात घडला. वेळेवर घोडा पळाल्याने नाईलाजास्तव मुलाची वरात चार चाकी वाहनात करावी लागली. मात्र या हास्यस्पद प्रकारामुळेनवरदेव मुलाची चांगलीच फजिती झाली व पाहुण्यांना सुद्धा हसू आवरले नाही. लग्न म्हटले कीअनेक मजेदार प्रसंग घडतात. नवरा आणि नवरी यांच्याबाबत तर फारच उत्सुकता. त्यात लग्न हा जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे आई –वडील मुलांच्या लग्नात भरमसाठ खर्च करतात.घोडा, बँडबाजा, डीजे लावून आंनदउत्सव साजरा होतें. परंतु अश्या आंनदात देखील काहीं मजेदारक्षणघडतात जे स्मरणात राहतात. असाच मजेदार किस्सा शहरातील एका



उच्चभ्रू कॉलनी परिसरातून निघालेल्या वरातीमध्ये घडला. येथील एका वरमुलाची नवरदेव राशी १३ मे रोजी रात्री घरापासून वाजत–गाजत वरात निघाली. यावेळी मित्रांनी नाचण्यासाठी नवरदेव मुलाला घोड्यावरून खाली उतरविले. नाचत असताना तितक्यातच घोडा मालकाच्या हातून लगाम सुटली आणि घोड्याने थेट दीड किलोमीटर पर्यंत धूम ठोकली. त्यामुळे नवरदेव मुलाची चांगलीच फजित झाली परंतु मित्रांसह वरातीमधील पाहुण्यांना सुद्धा हसू आवरेनासे झाले होते त्यामुळे या प्रकाराची शहरात चांगलीच चर्चा रंगली होती.

# अग्नितांडव! ८० प्रवाशांना घेऊन बस दिल्लीला निघाली,
# अचानक पेट घेतला, ५ जणांचा होरपळून मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ लखनऊ –** लखनौमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. गुरुवारी सकाळी किसनपथ परिसरात धावत्या बसने अचानक पेट घेतली. या अपघातात ५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला. तर, इतर गंभीर प्रवासी जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. बस बिहारहून दिल्लीला जात होती. दरम्यान, या घटनेची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी अपघातग्रस्तांना तातडीने रूग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी ५ जणांना मृत घोषित केले.

ही धक्कादायक घटना गुरूवारी सकाळी किसनपथावर घडली. ही बस बिहारहून दिल्लीच्या दिशेने जात होती. दरम्यान, शॉर्ट सक्रिटमुळे बसने अचानक पेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. काही क्षणातच आगीने संपूर्ण बसला वेढले. आग लागताच चालक आणि कंडक्टर यांनी बसमधून उडी घेतली. तर, बसमधील ८० प्रवाशांनी बसच्या काचा फोडून



स्वत:चा जीव वाचवण्याचा प्रयत्न केला.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, धावत्या बसने पेट घेतल्यानंतर अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांना तातडीने रूग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासून ५ लोकांना मृत घोषित केले. ज्यात दोन मुलांसह पाच जण जिवंत जळाले.

या घटनेनंतर डीसीपी आणि इतर अधिकारी घटनास्थळी पोहोचले असून, पोलिसांनी या घटनेच्या अधिक तपासाला सुरूवात केली आहे. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# नकारात्मक बातम्यांना ब्रेक
# सरकार करणार 'फॅक्ट चेक'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई :** विविध समाजमाध्यमे आणि डिजिटल माध्यमांवर राज्य सरकारबाबत येणाऱ्या नकारात्मक, समाजात भय पसरविणाऱ्या आणि वस्तुस्थितीवर आधारित नसणाऱ्या बातम्यांचे 'फॅक्ट चेक' करून लगेच उत्तर देणारी यंत्रणा आता उभारली जाणार आहे.

विविध चॅनेलवर येणाऱ्या बातम्या आणि वृत्तपत्रांमधून येणाऱ्या बातम्यांचा खुलासा काही तासांच्या आतच करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाने यापूर्वीच सर्व विभागांना दिले असून त्याची अंमलबजावणीदेखील सुरू झाली आहे. आता समाजमाध्यमे आणि डिजिटल बातम्यांची सत्यासत्यता ही यंत्रणा तत्काळ तपासेल आणि उत्तरही देईल. माहिती व जनसंपर्क विभागावर या यंत्रणेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सरकारविरोधात कशा पद्धतीने ट्रेंड तयार केला जात आहे याचा अंदाजदेखील या यंत्रणेद्वारे येणार आहे. ही यंत्रणा उभारण्यासाठी पुढील पाच वर्षांकरता ४ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**विविध सेवा घेणार–** राज्य सरकारच्या योजना, ध्येयधोरणे, विकासकामांची प्रसिद्धी या करता विविध प्रकारच्या सेवा घेण्यात येणार असून त्यासाठी एका संस्थेची निवड केली जाणार आहे. माहिती व जनसंपर्क विभागाच्या यंत्रणेला सहकार्य करणारी ही सेवा असेल. त्यात बातम्यांचे संपादन, विशेष वृत्तांचे संपादन, लेखांची तपासणी, समाजमाध्यमांवरील मजकुराचे आणि विविध माध्यमांवरील जाहिरातींचे संपादन, पत्रकार परिषदांचे




आयोजन, लोकराज्यसाठी मजकूर लिहिणे आदी कामे ही संस्था करेल.

**संदर्भ व संशोधन कक्ष–** माहिती व जनसंपर्क विभागात संदर्भ व संशोधन कक्ष उभारण्यात येणार आहे. सरकारच्या विविध विभागांच्या प्रसिद्धीचे काम अधिक गतीने होण्यासाठी अचूक माहिती उपलब्ध व्हावी यासाठी हा कक्ष काम करेल. त्यासाठी एका संस्थेची निवड केली जाईल. त्यासाठी यंदापासून पुढील चार वर्षांसाठी चार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या आजवरच्या योजना, कामगिरी, महत्त्वाची भाषणे, विविध विभागांची आजवरची अंदाजपत्रके, महामंडळांचे अहवाल यासह विविध प्रकारची माहिती या कक्षात उपलब्ध होईल.

**प्रतिमा निर्मितीसाठी संस्था–** राज्य सरकारच्या प्रतिमा निर्मितीसाठीचे काम एका संस्थेला दिले जाणार आहे. विविध क्षेत्रात राज्य सरकारचे ब्रँडिंग करण्याचा हेतू त्या मागे असेल. माहिती व जनसंपर्क विभागावर त्यासाठीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यासाठीच्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

# टाकरखेडा शंभूमध्ये १ तास धुवांधार पाऊस
## झाड कोसळल्याने एसटी अडकली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५टाकरखेडा शंभू –** बुधवार, १४ मे रोजी संध्याकाळी जिल्ह्यातील टाकरखेडा शंभूमध्ये अचानक विजांच्या कडकडाटात १ तास मुसळधार पाऊस पडला. हा पाऊस संध्याकाळी ५:३० वाजता सुरू झाला आणि सुमारे १ तास सुरू राहिला. जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे टाकरखेडा



शंभू–अमरावती रस्त्यावर झाड पडल्याने एसटी अडकली. रात्री उशिरापर्यंत खूप प्रयत्न केल्यानंतर झाड काढून टाकण्यात आले, त्यानंतरच वाहतूक सुरळीत झाली. आणि रस्त्यावरील वाहतूक सुरळीत झाली. यासोबतच, पुलगावमध्ये बुधवारी संध्याकाळी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला. हे उल्लेखनीय असे की,

चक्रीवादळ उत्तराखंड, कोकण, बिहार, गुजरात आणि नैऋत्य बंगालच्या उपसागरावर ४.५ किमी उंचीवर पुढे सरकत आहे. यासोबतच, बिहार, पश्चिम बंगाल, झारखंड, रायलसीमावर कमी दाबाचे क्षेत्र आहे. नैऋत्य मान्सून १३ मे रोजी अंदमान समुद्रात आणि त्याहून थोडे पुढे पोहोचला. तो ३-४ दिवसांत दक्षिण अरबी समुद्रात पोहोचण्याची अपेक्षा आहे. विदर्भात २० मे पर्यंत पाऊस पडण्याची शक्यता हवामानशास्त्रज्ञ प्रो. अनिल बंड यांनी व्यक्त केली आहे. १५ मे रोजी अकोला, बुलढाणा, यवतमाळ, चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात मेघगर्जनेसह आणि जोरदार वाऱ्यांसह विखुरलेला पाऊस पडेल.

# ऑपरेशन सिंदूरचा विरोध करणाऱ्या
# रेजाझ सिद्दीकीवर लागणार 'यूएपीए'?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई–** केरळमधील अर्बन नक्षलवादी व तथाकथित मुक्त पत्रकार रेजाझ सिद्दीकीवर 'यूएपीए' लागण्याची चिन्हे आहेत. केरळ व महाराष्ट्रातील एटीएस पथकाकडून त्याची चौकशी सुरू आहे. त्याच्या चौकशीतून जम्मू-काश्मीरमधील तरुणांचे 'ब्रेन वॉशिंग' करून त्यांना नक्षलवादी कारवायांत समाविष्ट करण्याचे कारस्थान समोर आले आहे. ऑपरेशन सिंदूरचा सोशल माध्यमांवर विरोध करणाऱ्या रेजाझच्या चौकशीतून आणखी मोठ्या 'लिंक्स' समोर येण्याची शक्यता आहे.






रेजाझ माडेपड्डी शिबा सिदीक (वय २६ एडापल्ली, केरळ) हा काही दिवसांअगोदर दिल्लीत झालेल्या परिषदेत सहभागी झाला होता. ही परिषद देशात समाजविरोधी कारवाया करणाऱ्या पत्रकारांच्या सुटकेसाठी आयोजित करण्यात आली होती. तेथे त्याची काही नक्षलसमर्थक लोकांशीदेखील भेट झाली होती. तो स्वत:ला मुक्त पत्रकार व विद्यार्थी कार्यकर्ता म्हणवायचा. 'डेमोक्रॅटिक स्टुडंट्स असोसिएशन'शी संबंधित असलेला रेजाझ दिल्लीहून केरळला परतत असताना त्याच्या मैत्रिणीला भेटण्यासाठी नागपुरात आला होता. त्याची मैत्रीण ईशा हीदेखील त्याच्या कृत्यात सहभागी होती. पोलिसांना याची माहिती मिळताच लकडगंज पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका हॉटेलमधून दोघांना ताब्यात घेण्यात आले होते. तो 'मकतूब मीडिया' आणि 'द ऑब्झर्व्हर पोस्ट'सारख्या आउटलेटसाठी प्रक्षोभक लेख लिहायचा. भारत सरकारविरोधात संघर्ष पुकारण्याच्या तयारीच्या कलमाअंतर्गत त्याला अटक करण्यात आली होती. त्याच्या चौकशीसाठी केरळ व महाराष्ट्रातील एटीएसचे पथकदेखील दाखल झाले.

**घराची झडती, नातेवाइकांची चौकशी**

एटीएसच्या पथकाने त्याच्या एलामक्कारा किर्थीनगर येथील घरी जाऊन झडती घेतली. तेथे पेन ड्राइव्ह व काही आक्षेपार्ह कागदपत्रे आढळली. त्यातून त्याचे पाकिस्तानच्या हँडलर्ससोबत कथित संबंध असल्याची बाबदेखील समोर आली. त्याच्या नातेवाइकांचीदेखील चौकशी करण्यात आली. त्याच्यावर काश्मीरमधील तरुणांचे ब्रेनवॉशिंग करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. स्वयंसेवी संघटनेच्या माध्यमातून तेथे नेटवर्कचा विस्तार करत माओवादी विचारसरणीचा प्रचार-प्रसार करण्यावर त्याचा भर होता.

**एनआयएकडूनदेखील होऊ शकते चौकशी**

सध्या रेजाझ हा पोलिस कोठडीत आहे. त्याची कारस्थाने समोर आल्याने एनआयएकडून त्याचा तपास होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्याने ऑपरेशन सिंदूरविरोधात चिथावणीखोर इन्स्टाग्राम पोस्ट लिहिली होती. तो सेंट्रल एव्हेन्यूवरील अग्रसेन चौकात असलेल्या एअरगनच्या दुकानात पोहोचला होता व तिथे दोन बंदुकींसह फोटो काढत तो सोशल माध्यमांवर पोस्ट केला होता. युके-आधारित सिम कार्डद्वारे तो अनेकदा संवाद साधायचा.

**विविध माओवादी संघटनांशी संबंध**

रेजाझ याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत. चौकशीदरम्यान तो केरळमधील 'डेमोक्रॅटिक स्टुडंट युनिट'चा सदस्य असल्याची बाबदेखील समोर आली. भीमा कोरेगाव प्रकरणातील १६ आरोपींपैकी काहींशी त्याचा संपर्क होता. 'कमिटी फॉर प्रोटेक्शन ऑफ डेमोक्रॅटिक राइट्स' आणि 'कमिटी अगेन्स्ट स्टेट रेप्रेशन' याबंदी घातलेल्या संघटनांशीदेखील त्याचा संबंध होता.

# 'ऑपरेशन सिंदूर'मधून लष्कराची ताकद कळली
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई :–** पहलगामच्या दहशतवादी हल्ल्याला उत्तर देताना दहशतवादी कुठेही लपले, तरी आम्ही सोडणार नाही, हे भारतीय सैन्याने पाकिस्तानला दाखवून दिले आहे. हम ना झुकेंगे, ना रुकेंगे, ना बिकेंगे, ना थकेंगे अशी भारतीय सेनेची ताकद ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून जगाला कळाली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तर, निरपराध लोकांचे बळी घेणाऱ्या पाकिस्तानी दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करून भारतीय सैन्याने सूड उगवला आहे. 'ऑपरेशन



सिंदूर'मधून त्यांच्या गोळीचे उत्तर आपल्या सैन्याने मिसाईलने दिले. देशभक्ती आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा प्रत्येकाच्या अंगात संचारली पाहिजे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

भाजप कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, सांस्कृतिक मंत्री व मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, विधान परिषदेचे गटनेते आ. प्रवीण दरेकर, सैन्यदलातील निवृत्त अधिकारी सार्जंट सदानंद चिखले, सुभेदार सुभाष दरेकर, हवालदार शंकर कुंभार, नाईक विजय जगताप, पोपटराव दाते, शंकर कदम यांच्यासह मुंबईतील पदाधिकारी, आमदार, माजी आमदार, माजी नगरसेवक व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

**भारतीय सैन्याचे कौतुक –** सैन्याच्या तिन्ही दलांनी ऑपरेशन सिंदूर यशस्वी करून दहशतवाद्यांचे पाकिस्तानातील नऊ अड्डे उद्ध्वस्त केले. या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचे कौतुक करण्यासाठी मुंबई भाजपतर्फे बुधवारी ऑगस्ट क्रांती मैदान ते गिरगाव चौपाटी येथील शहीद तुकाराम ओंबळे स्मृती स्मारकापर्यंत तिरंगा रॅली काढण्यात आली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

**'सिंदूर' युद्धापेक्षाही अधिक सुंदर झाले**

पाकिस्तानशी झालेल्या तिन्ही युद्धांत लढलेले आणि आज वयाच्या नव्वदीत असलेले सार्जंट सदानंद चिखले हे यात्रेत सामील झाले होते. तिन्ही युद्धात भारत कधीही मागे हटला नाही. त्यावेळी आम्ही केलेल्या युद्धांपेक्षा ऑपरेशन सिंदूर हे अधिक सुंदर झाले, असे ते म्हणाले.

# संभाजीनगर दरोड्याने हादरले: मोठ्या उद्योजकाच्या बंगल्याला केले लक्ष्य
## ८ किलो सोने आणि ४० किलो चांदी वर मारला डल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ छत्रपती संभाजी नगर–** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वाळूज पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या अंतापूर शिवारात एका शेत वस्तीवर दरोडेखोरांनी घातलेला दरोड्याची घटना ताजी असतानाच आता गजबजलेल्या बजाज नगर येथील बड्या उद्योजकाच्या घरावर देखील दरोडा पडण्याची धक्कादायक घटना घडली आहे. या मध्ये दरोडेखोरांनी आठ किलो सोने आणि ४० किलो चांदी वर डल्ला मारला असल्याची माहिती देखील समोर आली आहे. या घटनेमुळे आता बजाज नगर परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. घटनास्थळी पोलिस दाखल झाले असून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार छत्रपती संभाजी नगरच्या वाळूज एमआयडीसी मध्ये बजाजनगर येथील उद्योजक संतोष राधाकिसन लड्डा यांच्या निवासस्थानी हा मोठा दरोडा पडला आहे. दरोडेखोरांनी यात




आठ किलो सोने आणि ४० किलो चांदी असा कोट्यावधी रुपयाचा मुद्देमाल लंपास केला आहे. यामध्ये घरात असणारे ड्रायव्हर आणि केअरटेकर यांचे हात पाय बांधून त्यांना बंदुकीचा धाक दाखवून हा दरोडा टाकण्यात आला असल्याची माहिती समोर आली आहे.

संतोष लड्डा हे मोठे उद्योजक असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात त्यांची चांगली ओळख आहे. त्यांचा मुलगा अमेरिकेत शिक्षणासाठी राहतो. त्याला भेटण्यासाठी लड्डा कुटुंब आठ दिवसांपूर्वीच अमेरिकेत गेले होते. त्यामुळे घराची देखरेख करण्याचे काम ड्रायव्हर आणि केअरटेकर कडे देण्यात आले होते.

लड्डा कुटुंब विदेशात असल्याचा फायदा घेत सहा दरोडेखोरांनी हे कृत्य केले असल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये केअर टेकरचे हात पाय बांधून त्याला बंदुकीचा धाक दाखवून पूर्ण घराची झडती घेण्यात आली. त्यामध्ये मौल्यवान दागिने आणि चांदी दरोडेखोरांनी लंपास केली आहे.

# बुलढाण्यात उत्तररात्री अग्निकांड
# मजुरांच्या संसाराची झाली राखरांगोळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५बुलढाणा:** बुलढाणा शहराच्या उत्तर सीमेच्या टोकावर मिर्झा नगरला लागून असलेल्या वस्तीत उत्तररात्री आग लागली. आग एवढी भीषण होती की वस्तीतील पाच घरांची राख झाली. एका ठिकाणाहून लागलेली ही आग हळूहळू इतर घरापर्यंत पोहोचली. दोन ते अडीच वाजेच्या सुमारास हा अग्नीतांडव सुरू झाला.

ही वस्ती डोंगराळ भागाला लागून असल्याने जोरदार वाऱ्यामुळे आगीने पाहता पाहता रौद्र रूप रूप धारण केले. दरम्यान काही समाज सेवकांनी या आगीची माहिती बुलढाणा नगर परिषदेच्या अग्निशमन दलाला दिली. यानंतर पालिकेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मात्र आग जास्त भडकल्याने नजीकच्या चिखली



नगर परिषदेच्या दलाला पाचरण करण्यात आले.

बुलढाणा नगरपालिकेचे दोन अग्निशमन वाहन आणि चिखलीचे एक मिळून तीन वाहनांनी तब्बल अडीच ते तीन तासापर्यंत सतत पाण्याचा जोरदार मारा केला. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न केल्यानंतर या भीषण आगीवर नियंत्रण मिळवता आले. सुदैवाने आगीत कुठलीही जीवित हानी झाली नाही. परंतु घरे खाक झाल्याने मोठे नुकसान झाले. जीवाची बाजी लावून आग विझवणाऱ्या अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. जळालेली घरे मजूर वर्गाची आहेत त्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी आहे. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. दरम्यान शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी बुधवारी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

## माजी सैनिकांसाठी
# व्यावसायिक वाहन भाडे योजना
### १६ मे पूर्वी नोंदणी करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती,** माजी सैनिकांसाठी व्यावसायिक वाहन भाडे योजना राबविण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी दि. १६ मे पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत राज्यात ५८७ ठिकाणे निश्चित केली आहे. प्रत्येक ठिकाणी व्यावसायिक वाहने भाडेतत्वावर घ्यायचे प्रस्तावित आहे. यासाठी संपूर्ण वाहने माजी सैनिकांची असावीत. माजी सैनिकांना ही स्वयंरोजगाराची संधी असून या योजनेंतर्गत वाहन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणाऱ्या माजी सैनिक, फिजिकल कॅज्युअल्टी, बॅटल कॅज्युअल्टी, सैनिकांच्या विधवांना स्वयंरोजगारासाठी देय अनुदान नियमानुसार देण्यात येईल. एकत्रित नवी वाहने खरेदी, कर्ज उपलब्धता यासाठी शासनस्तरावरून मदत केली जाणार आहे. याचा वाहन भाडेकरार मेस्को करणार असून सर्व वाहने मेस्कोकडे संलग्न राहतील.इच्छुक माजी सैनिकांनी आपले नाव जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती येथे दि. १६ मे २०२५ पूर्वी नोंदवावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील जि.प.वर्ग खोल्यांची दुरुस्ती करीता निधी द्या

## गरजू मुलिन साठीची सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना पुन्हा सुरु करा : प्राथमिक शिक्षक समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जि.प.अमरावती व मा.शिक्षणाधिकारी साहेब (प्राथमिक) जि.प.अमरावती यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा शाखा अमरावती यांनी जि.प.अमरावती अंतर्गत शाळांना शाळा दुरुस्ती करिता पावसाळा सुरू होण्यापूर्वी निधी उपलब्ध करून देण्यात यावा. सावित्रीमाई फुले दत्तक पालक योजना पूर्वीप्रमाणे सुरू करण्यात यावी अशी मागणी प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे.



अमरावती जिल्हा परीषद शाळेच्या शिकस्त वर्ग खोल्या यांची दुरस्ती करणे आवश्यक आहे.या अगोदर समग्र शिक्षा अभियान मधुन वर्ग खोल्या दुरस्ती करीता निधी मिळत होता पण तो निधी येणे बंद झाला आहे.या करीता जिल्हा नियोजन मधुन निधी मिळतो पण आज पर्यंत या वर्षाचा दुरुस्ती करीता निधी मंजुर झाला नाही.अमरावती जिल्हा मधिल १००वर्ग खोल्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.या करीता जिल्हा परीषद करुन पाठपुरावा होणे आवश्यक आहे.

जि.प. अमरावती अंतर्गत शाळा दुरुस्ती करीता पावसाळा सुरु होण्यापुर्वी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत निवेदन सादर करण्यात आले की, शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ ची सुरुवात यावर्षी २३ जुन २०२५ पासुन होणार आहे. पावासाळया मध्ये पाऊस सुरु झाल्यामुळे अनेक शाळांमध्ये शाळा दुरुस्ती अभावी विदयार्थी बसण्याची, वर्ग भरविण्याची अडचण निर्माण होते. तसेच अपघात होण्याची शक्यता सुध्दा नाकारता येत नाही.त्यामुळे निवेदनाच्या माध्यमातुन विनंती अशी की, जि.प. अमरावती अंतर्गत ज्या शाळांचे शाळा दुरुस्ती संबंधाचे प्रस्ताव आपणाकडे सादर झाले आहेत अशा शाळांना व ज्या ठिकाणी दुरुस्तीची आवश्यकता आहे, अशा शाळांना पावसाळा सुरु होण्यापुर्वी निधी उपलब्ध करुन दयावा.सावित्रीबाई दत्तक पालक योजना सुरु करण्याबाबत.

शिक्षक, शिक्षणप्रेमी यांनी स्वतः निधी जमा करुन जिल्हा परिषद शाळेतील अनाथ, गरजु मुलीना दरवर्षी प्रथम रु.३००/- नंतर रु.५००/- याप्रमाणे जिल्हातील प्रत्येक शाळेच्या एका मुलीला शिष्यवृत्ती देण्यात येत होती. परंतु काही वर्षापासुन या योजनेचा लाभ या मुलीना मिळाला नाही.हा निधी महाराष्ट्र बैंक शाखा गाडगेनगर व शिक्षक सहकारी बँक अमरावती येथे मुदत ठेवीमध्ये रक्कम ठेवण्यात आंली आहे.दरवर्षी या ठेवीवर मिळणाऱ्या व्याजावर ही योजना सुरु होती पण शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या व संबंधीत शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या वेळ काढू धोरणामुळे ही योजना बंद स्वरुपात आहे.त्यामुळे जिल्हातील जि.प.शाळेत शिकणार्या अनाथ,गरजू,पालक नसणार्या मुलिंना हा लाभ मिळणे बंद झाले आहे.

निवेदन वेळी शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार,जिल्हा सरचिटणीस शैलेश दहातोंडे,जिल्हा नेते गोकुलदास राऊत,जिल्हा सल्लागार संभाजी रेवाळे,जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत निमकर,जिल्हा कोषाध्यक्ष नंदकीशोर पाटिल,जिल्हा कार्यालय सचिव मनिष काळे,राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर.

# मंत्र्यांच्या घरासमोर रक्तदान आंदोलन करत केला निषेध

## प्रहारकडून दिव्यांगांना ६००० रूपये मानधनाची मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५यवतमाळ**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी राज्यभरातील मंत्र्यांच्या घरासमोर प्रहार जनशक्ती पक्षाचे रक्तदान आंदोलन सुरू आहे. यातच छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या यवतमाळ येथील घरासमोर सकाळी १० वाजता जिल्हा प्रहार संघटनेच्या वतीने रक्तदान करून आंदोलन करण्यात आले.

विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी सर्वपक्षीय आमदारांनी त्या-त्या पक्षाची निवडणूक जाहिरनाम्याव्दारे कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. राज्यात दिवसाला ७ शेतकरी आत्महत्या करत असल्याचे धक्कादायक वास्तव पुढे येत आहे. तरी सुद्धा शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात सरकार चकार शब्द काढायला तयार नाही. यावरूनच प्रहार पक्षाचे राज्यात सर्व मंत्र्यांच्या घरासमोर रक्तदान करून आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रहारच्या अनेक कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. या अनोख्या आंदोलनामुळे सरकारचे लक्ष सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे वेधण्याचा हा प्रयत्न होता.

यावेळी शेतकरी कर्जमाफी, पेरणी ते कापणीपर्यंत खर्च एमआरजीएसमधून करण्यात यावा. सोबतच दिव्यांग बांधवांना ६००० रूपये मासिक मानधन देण्याबाबतच्या मागण्या करण्यात आल्या. यावेळी अमरावतीचे जिल्हा प्रमुख प्रवीण हिंडवे, सुरज गणथडे नेर तालुका प्रमुख गौरव नाईकर, संदिप कोल्हे निलेश राठोड आशिष तुपटकर प्रवीण ढाकूलकर अजय पड्याळ दिलीप डवरे, प्रमोद कातरकार, रोशन वातीले, रवी जाधव, संजय दुर्गुळे, बंटी पठाण, सतिश काळे, योगेश आडे, शरद ठाकरे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# देवेंद्र भुयार यांच्या पुढाकाराने ६ वर्षाच्या भावार्थ राऊत यांच्यावर मुंबई येथे शस्त्रक्रिया



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५वरूड**

माजी आमदार देवेंद्र भुयार यांची मोर्शी विधानसभा मतदार संघामध्ये निरंतर रुग्णसेवा सुरू असून त्यांनी आत्तापर्यंत शिक्षण, आरोग्य, महिलांचे प्रश्न अशा विविध प्रश्नांवर त्यांनी चांगले काम केलं आहे. ते सातत्याने नाविन्यपूर्ण काम करण्यात अग्रेसर असतात. असेच त्यांच्याकडे आरोग्याचा विषय घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला ते नेहमी सहकार्य करतांना दिसत आहे. माजी आमदार देवेंद्र भुयार हे वरुड मोर्शी तालुक्यातील रुग्णांचा ईलाज करण्यासाठी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्णसेवा देण्यासाठी नेहमी तत्पर असतात, देवेंद्र भुयार यांनी ज्या गरिबांजवळ असाध्य रोगांवर उपचार करवून घेण्यासाठी पैसा नाही, ज्यांना मरणाशिवाय पर्याय नाही अशा रुग्णांना मदत करत आहे. त्यांनी मतदार संघातील ग्रामीण भागांत राहणार्या गरीब व कोणीही वाली नसलेल्या रुग्णांना स्वास्थ्य सुविधा पुरवविण्याचे काम करीत आहे.

वरुड तालुक्यातील पुसला येथील ६ वर्षाचा चिमुकला भावार्थ गजानन राऊत यांच्या तब्बेतीची माहिती मिळताच देवेंद्र भुयार यांच्या पुढाकाराने एस आर सी सी चिल्ड्रन हेल्थ हॉस्पिटल हाजी अली मुंबई येथे भावार्थ गजानन राऊत यांना दाखल करण्यात होते भावार्थ गजानन राऊत यांचे हार्ड मधील छिद्राची जवळपास ३ लाख रुपयांची मोफत शस्त्रक्रिया मुंबई येथील रुग्णालयात यशस्वी करण्यात आली. माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्या माध्यमातून ६ वर्षाचा चिमुकला भावार्थ गजानन राऊत यांना मुंबई येथील नामांकित रुग्णालयात दाखल करून सर्व उपचार मोफत उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी आमदार देवेंद्र भुयार यांनी भावार्थ राऊत यांची भेट घेऊन झालेल्या शास्त्रक्रियेबद्दल माहिती घेतली असून आता भावार्थ राऊत ठणठणीत बारा झाला असल्यामुळे राऊत कुटुंबाला दिलासा मिळाला. माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्या या जागरूक पणामुळे फार मोठा आरोग्याचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे राऊत परिवाराने देवेंद्र भुयार यांचे आभार मानले.

# समाजाला गोपाल पाटील सारख्या सच्चा सेवकाची गरज - मठाधिश्वर श्रद्धेय जितेंद्रनाथ महाराज

## हजारोंच्या उपस्थितीत वाढदिवस अभिष्टचिंतन कार्यक्रम साजरा : हजारो रुग्णांनी घेतला मोफत नेत्र तपासणी शिबिराचा लाभ:युवकांनी केले रक्तदान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ दर्यापूर**

आज प्रत्येक व्यक्ती आपल्या स्वतःच्या फायद्यासाठी जगत असून कोणालाही कोणाची दया येत नाही,आपल्या ताटात करे जास्त येईल असा विचार प्रत्येक व्यक्ती करत असताना अशा स्वार्थी जगत रुग्णसेवक म्हणून गोपाल पाटील अरबट निःस्वार्थी सेवा करत आहेत. त्यांना समाजातील चांगल्या लोकांनी साथ दिली पाहिजे व समाजाचे भले केले पाहिजे,असे प्रतिपादन अंजनगाव येथील देवनाथ पिठाचे प्रमुख जितेंद्रनाथ महाराज यांनी केले आहे.दर्यापूर येथील कृषी भवनात शिवसेना दर्यापूर तालुका व गोपाल पाटील अरबट मित्र परिवार यांच्या वतीने हजारोंच्या उपस्थितीत वाढदिवस अभिष्टचिंतन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.यावेळी आयोजित निःशुल्क रोगनिदान शिबिर व मोफत चष्मे वाटप शिबिराचा हजारो रुग्णांनी लाभ घेतला व: युवकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

सावंगी मेघे रुग्णालयवर्धा येथील नामवंत तज्ञ डॉक्टरची टिम यावेळी उपस्थित होते.यामध्ये स्त्रीरोग तज्ञ,नाक काण घसा तज्ञ,हृदयरोग तज्ञ,शुगर बिपी,कर्क रोग अशा सर्व आजारावर रुग्णांना मोफत सल्ला देण्यात आला.तसेच डोळे तपासणी व मोफत चष्मे वाटप व मोफत औषधी वाटप करण्यात आले.यावेळी तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना सायकली,अपंगांना रिक्षा,महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी अमरावती जिल्ह्यातील सर्वच राजकीय सामाजिक पक्षाचे नेते, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सर्व कार्यक्रमात अंजनगाव सुर्जी येथिल देवनाथ मठाचे मठाधिश्वर श्रद्धेय जितेंद्रनाथ महाराज यांची उपस्थिती व त्यांनी दिलेला बहुमुल्य वेळ व केलेले मार्गदर्शन गोपाल अरबट बद्दल कौतुकाची व कार्याची पावतीच प्रदाण करणारे होती.महाराजांनी आपल्या भाषणात गोपाल पाटिल अरबट यांचे व ते करीत असलेल्या कार्याचे तोंडभरुन कौतुक केले,ते म्हणाले की,गोपालला मी चांगला ओळखतो,गोपालची समाजसेवा व रुग्णसेवा वाखानन्यागी असुन गोपाल अरबट यांनी जो रुग्ण सेवेचा वसा घेतलेला आहे तो वसा म्हणजे प्रकारे गोपाल नारायण सेवाच करीत आहे.आज तालुक्याला गोपाल अरबट सारख्या तरुणाची गरज असुन आपण सर्वांनी त्याला साथ द्यावी असं आवाहन करुन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्यात.सोबतच गोपाल पाटील अरबट यांच्या अर्धांगिनी अश्विणी ताई यांची सुध्दा समाजकार्य करीत असताना गोपालला जी साथ मिळते ती कौतुकास्पद आहे असे उदगार महाराजांनी काढले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवसेना उप तालुकाप्रमुख मनोज गव्हाणे व अश्विणी अरबट यांनी केले.

याप्रसंगी शिवसेना संपर्क प्रमुख रवी गणोरकर,नव्याने प्रवेश घेतलेले सुनिल डिके,भाजपाचे मदन बायस्कार,भाजपा शहर प्रमुख मेघा भारती,शिवसेना जिल्हयातील महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी,वर्षाताई भोयर, संगिताताई मढावी,मायाताई देशमुख,कोमल बद्रे,जयश्री कातखिडे,अरुणा ईंगोले,रेखा खारोडे,सहसंपर्क रविंद्र गणोरकर, उपजिल्हाप्रमुख, रवी पवार सुनील केने भूषण नागे अमोल भुयार,तालुकाप्रमुख महेंद्र भांडे,नितीन चौखंडे, मंगेश काळमेघ, पंकज निंबोकार,उप तालुका प्रमुख मनोज गव्हाणे, विलास साखरे,राजू पोहकार मदत कक्ष प्रमुख सोनालीताई देशमुख गणेशराव गावंडे गणेशराव लाजूरकर,निरज नागे अमित ठाकरे गजेंद्र ढवळे नंदू निकोले कुलदीप ढेपे टिकू पाटील विनय गावंडे नागेश कांबे विजय तळोकार गजू चांदूरकर हेमंत उमाळे राहुल भुम्बर नंदकिशोर अरबट ज्ञानेश्वर अरबट नागोराव केणे शरद अरबट तुषार चौधरी संजय राणे सोपान वडतकर गोपाल तराळ सौरभ वायझाडे संजय राणे सागर गेठे शिवा उबरकर योगेश बुंदे शामभाऊ साखरे दिनेश पांडे सुधाकर फुलबरकर अशोक रेखे गजेंद्र राऊत डॉ पठाण, डॉ ठाकरें गणेश भाऊ साखरे सुभाष घाटे सतीश काळे अनिकेत कोळमकर भाष्कर धोटे रवी राजपूतपियुष माहुले भानदास सपकाळ प्रवीण मोपारी सचिन कोरडे शरद अरबट किशोर राऊत शेखर डहाकेआदी उपस्थित होते.

# पी.आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलची उत्तुंग भरारी..!

## अमरावती जिल्ह्यात सलग तिसऱ्या वर्षी बाजी मारत मिळवले जिल्ह्यातील प्रथम स्थान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

पी.आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल, अमरावतीने सीबीएसई बोर्ड दिल्ली मार्फत मार्च २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १०वी च्या परीक्षेमध्ये शत-प्रतिशत निकालाची परंपरा कायम ठेवत, सलग तिसऱ्या वर्षी अमरावती जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान मिळवला आहे.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा आणि शाळेच्या शिक्षणपद्धतीचा उत्तम समन्वय साधत विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले. ही यशाची परंपरा सलग तीन वर्षे कायम राखल्यामुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्ता व विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे मोठे यश म्हणून गौरवले जात आहे. बारावी सीबीएसई मधून विवान



सोहित खत्री जिल्ह्यातून प्रथम आला तर दहावी सीबीएसई मधून सारंग सुभाष काजळकर हा स्कुल मधून प्रथम आला आहे.

या यशामागे प्राचार्य, शिक्षकवृंद आणि पालकांचे मोलाचे योगदान असून, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि अभ्यासाबरोबरच कौशल्यविकासावर भर देणारी शाळेची शैक्षणिक दृष्टी याचे फळ म्हणून हे यश प्राप्त झाल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील, उपाध्यक्ष श्रेयस दादा पोटे पाटील, इंटरनॅशनल स्कूल प्राचार्य श्री सचिन दुर्गे सर, इंटरनॅशनल स्कूल उपप्राचार्य सोनल निस्ताने, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंकुश राजगिरे, अकॅडमिक इन्चार्ज शिल्पा वानखडे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# वारकरी बाल संस्कार शिबिराचे थाटात उद्घाटन : स्वतःवर विश्वास हा यशाचा मार्ग

**डॉ.हेमंत देशमुख**
**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

दुसऱ्यावर भरोसा ठेवणे ही आपली कमजोरी आहे तर स्वतःवर भरोसा ही आपली ताकद असून स्वतःवरचा विश्वास हा यशाचा मार्ग आहे. असे मार्गदर्शनपर उद्गार विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे कोषाध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे शहर अध्यक्ष डॉ.हेमंत देशमुख यांनी काढले.युगांतर ग्राम विकास मंडळ सांगानी नगर च्या वतीने आयोजित भागवत धर्मप्रसार ज्ञानोबा तुकोबा वारकरी बालसंस्कार निवासी शिबिराच्या उद्घाटननाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला दिलीप वऱ्हाडे,सितारामजी पडोळे, ह भ प ज्ञानेश्वर महाराज पातशे, शालिग्राम महाराज खेळकर, शरदराव कणसे, गंगाधरराव पवारखेडे,वासुदेव गुल्हाने, किशोर धानोरकर, रमेश गुल्हाने, किशोर पिंजरकर ,गोविंद वऱ्हाडे, अतुल तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



अमरावती मध्ये ११ मे ते २१ मे या दरम्यान आयोजित करण्यात आलेले भागवत धर्मप्रसार ज्ञानोबा तुकोबा वारकरी बालसंस्कार निवास शिबिर हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. शिबिराच्या माध्यमातून मुलांवर जे धर्म संस्कार करण्यात येतील त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात भर पडेल विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचा संघर्ष,संस्कार आठवून आपल्या स्वतःवर विश्वास ठेवून जीवन जगले पाहिजे. स्वतःवरील विश्वास हा आपल्याला पुढे जाण्यासाठी मार्ग दाखवतो.कोणीही अहंकार न करता परिश्रम घेऊन चांगली पुस्तके वाचून ध्येयप्राप्ती साठी प्रयत्न करावे. वेळेचे नियोजन करून अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कष्ट केले पाहिजे असे मार्गदर्शन देखील डॉ.हेमंत देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युगांतर ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष दिलीप वऱ्हाडे यांनी केले तर संचालन डॉ.शरदराव कणसे यांनी केले. या शिबिराला विविध मान्यवरांनी भेट देऊन मार्गदर्शन देखील केले.

# आजपासून कृषी सहायकांचे काम बंद आंदोलन; पत्र केले सादर




विदर्भ प्रजासत्ताक
दि.१५ अमरावती

प्रलंबित मागण्यांकडे शासन-प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी गुरुवारपासून महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेने बेमुदत काम बंद आंदोलनाची हाक दिली आहे. खरीप हंगामाच्या तोंडांवर आंदोलनाचे हत्यार उपण्यात येणार आहे. याबाबत बुधवारी संबंधित तालुका कृषी अधिकाऱ्यांना कृषी सहायकांनी पत्रही देण्यात आले.

महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटना व कृषि मंत्री माणिकराव कोकटे यांच्यात बैठक झाली. कृषी सहाय्यकांच्या मागण्यांची पूर्तता करण्याची ग्वाही देण्यात आली. मागण्या पूर्ण झालेल्या नाहीत, असे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे संघटने २९ एप्रिलच्या पात्रन्वये आंदोलन पुकारण्यात आले आहे. ५ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात धाव घेत संघटनेने अधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यानंतर काळ्याफिती लावून व नंतर धरणे आंदोलनही करण्यात आले.

कृषी सेवक कालावधी रह करुन कृषि सेवकांना नियमित कृषि सहाय्यक पदावर नियुक्ती देण्यात यावी. कृषी सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषि अधिकारी करण्यात यावे. कृषी विभागामधील संपूर्ण कामकाज डिजिटल स्वरुपात होत असून, कृषि सहाय्यकांना लॅपटॉप देण्यात यावा. कृषी सहाय्यकांना ग्रामस्तरावर कामकाजासाठी कृषि मदतनिस देण्यात यावे.ग्रामस्तरावर समकक्ष असणाऱ्या तलाठी वव ग्रामसेवकाप्रमाणे मदतनिस मिळावा. कृषी विभागाचा आकृतीबंधास तात्काळ मंजुरी द्यावीव त्यामध्ये कृषि पर्यवेक्षक यांची पदे वाढवून कृषी सहाय्यकांच्या पदोन्नतीमधील कुंटितावस्था दूर करावी. महसूल विभागाप्रमाणे आकृतीबंध करावा, कृषि सहाय्यक कृषि पर्यवेक्षक यांचे प्रमाण ४ : १ या प्रमाणे करावे. पोकरा योजनेत समूह सहाय्यकांची पदे पूर्वीप्रमाणे भरण्यात यावी. रोजगार हमी योजनेअंतर्गत लक्षांक देतांना क्षेत्रीय स्तरावरील अडचणीचा विचार करुन लक्षांक देण्यात यावा, आदी मागण्या केल्या आहेत.

त्यामुळे बहिष्कार निविष्ठा वाटपासंदर्भात वारंवार निवेदन देवून सुद्धा त्यामध्ये सुसुत्रता येत नसल्याचे महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटनेचे म्हणणे आहे. कृषी सहाय्यकांना वाहतूक भाड्यापोटी आर्थिक भार सहन करावा लागत आहे. मार्गदर्शक सुचनेमध्ये विविध योजनेत कृषि सहाय्यक यांना वाहतूक भाड्याची तरतूद करावी किंवा निविष्ठा वाटप परमिटद्वारे करावे, अन्यथा खरीप हंगाम २०२५ मधील निविष्ठा वाटपावर संघटनेचा बहिष्कार असेल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी फेर प्रभाग रचना करा : राज्य निवडणूक आयोगाचे राज्य सरकारला निर्देश




विदर्भ प्रजासत्ताक
दि.१५मुंबई

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी फेर प्रभाग रचना करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी निवडणूक आयोगाने तयारी सुरू केली आहे. त्यानुसार आता राज्य सरकारला फेर प्रभाग रचना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मागील जवळपास पाच वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. त्यामुळे राज्यभरातील राजकारण्यांमध्ये अस्वस्थता होती. मात्र अखेर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आता आगामी चार महिन्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीची सर्वच राजकीय पक्षांच्या वतीने देखील तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यातच आता निवडणूक आयोगाने देखील या निवडणुका लवकरात लवकर घेण्यासाठी कंबर कसली आहे. यात आता राज्य सरकारला फेरफार रचना करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाच्या वतीने देण्यात आले आहेत.

### १९९४ ते २०२२ पर्यंत ओबीसी आरक्षणाच्या स्थितीनुसार निवडणुका

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका पुढील ४ महिन्यांच्या आत घेण्याचे महत्वपूर्ण निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी करताना दिले. कोर्टाने ही निवडणूक १९९४ ते २०२२ पर्यंत ओबीसी आरक्षणाची जी स्थिती होती त्यानुसार घेण्याचे आदेश दिलेत. विशेषतः राज्य निवडणूक आयोगाला यासंबंधी ४ आठवड्यांच्या आत अधिसूचना जारी करण्याचेही निर्देश दिलेत. त्यामुळे महाराष्ट्रातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बार दिवाळीपूर्वी उडणार हे निश्चित झाले आहे. ओबीसी आरक्षणाच्या वादामुळे महाराष्ट्रात २०२१ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती एन के सिंह यांच्या खंडपीठापुढे या प्रकरणी सुनावणी झाली. त्यात कोर्टाने ह्या निवडणुका ४ महिन्यांच्या आत घेण्याचे निर्देश दिलेत. कोर्टाच्या आदेशांनुसार, ओबीसी समुदायाला २०२२ पूर्वी असणारे आरक्षण कायम ठेवून ४ महिन्यांच्या आत ही निवडणूक घ्यावी लागेल. ही निवडणूक बांठिया आयोगाच्या अहवालाला आव्हान देणाऱ्या याचिकांवरील निकालाच्या अधीन असतील, असेही कोर्टाने या प्रकरणी स्पष्ट केले आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थांना वाऱ्यावर सोडता येणार नाही

स्थानिक स्वराज्य संस्थांना अनिश्चित काळासाठी वाऱ्यावर सोडता येणार नाही. वेळेवर निवडणुका हे तळागाळातील लोकशाहीचे सार आहे. त्यामुळे जिथे मुदत संपली आहे किवा प्रशासन राज आहे अशा सर्वच महापालिका, नगर परिषदा, नगर पंचायती व जिल्हा परिषदांची लवकर निवडणुका घेण्यात याव्यात, असे निरिक्षणही कोर्टाने या प्रकरणी आपल्या आदेशात नोंदवले आहे.

### लोकशाहीच्या मूळ तत्वांचा अवमान

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेवर न घेणे हे लोकशाहीच्या मूळ तत्वांचा अवमान आहे. सद्य स्थितीत ग्रामपंचायत ते जिल्हा परिषदांपर्यंत सर्वच प्रातिनिधिक संस्था केवळ अधिकाऱ्यांच्या ताब्यात असल्याचे चित्र आहे. हे अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांची रखडलेली निवडणूक २०२२ च्या जुलैपूर्वी लागू असलेल्या ओबीसी आरक्षणाच्या आधारे घेण्यात याव्यात. हा आदेश अंतिम नाही. बांठिया आयोगाच्या अहवाला देण्यात आलेल्या आव्हान याचिकेवरील निर्णयानंतर या निवडणुकांच्या वैधतेवर फेरविचार होऊ शकतो, असे कोर्ट म्हणाले.

# 'त्या' काँग्रेस नेत्याच्या मुलाचा शोध नाही; लोकेशन नागपुरात, पोलिस पथक रवाना : दुचाकी बडनेरा येथील रेल्वे स्टेशनवर आढळून आली



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१५अमरावती

ऐन बोहल्यावर चढण्याच्या आदल्या दिवशी घरातून गायब झालेल्या काँग्रेस नेत्याच्या पुत्राचा अद्याप शोध लागला नाही.दरम्यान बुधवारी १४ मे रोजी दुसऱ्या दिवशी त्याचे लोकेशन नागपुरात मिळाले आहे. त्यामुळे फ्रेजरपुऱ्याचे पोलिस उपनिरीक्षकांच्या नेतृत्वातील चार सदस्यीय चमू त्या दिशेला रवाना झाली असून, त्याचा शोध घेतला जात आहे.येथील काँग्रेसनगरचे रहिवासी, सहकार क्षेत्रात प्राबल्य राखणारे नेते यांच्या मुलाचा विवाह बुधवारी ठरला होता. त्यादृष्टीने वर-वधू अशा दोन्ही कुटुंबात आनंदाचे वातावरण होते. परंतु मंगळवारी १३ मे रोजी सकाळी नियोजित वर गायब झाला. बराच वेळ झाल्यानंतरही तो न परतल्यामुळे काळजीत पडलेल्या वडिलांनी दुपारनंतर फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. काही आवश्यक साहित्य आणायचे आहे, असे सांगून हा नियोजित वर घराबाहेर पडला होता, असे त्यांनी तक्रारीत नमूद केले. त्यानुसार पोलिसांनी त्याचा शोध घेणे सुरू केले.दरम्यान सायंकाळी त्या नियोजित वराची दुचाकी बडनेरा रेल्वे स्टेशनवर दिसली. त्यामुळे त्याने रेल्वेने मुंबई किंवा नागपुरच्या दिशेने कूच केले असावे, असा अंदाज पो पोलिसांमार्फत बांधला गेला. शोध मोहीम सुरू असतानाच पोलिसांना त्याचे लोकेशन नागपुरात आढळल्याने पोलिसांनी चार सदस्यीय चमू गठित करून शोध सुरू केला.पोलिसांच्या माहितीनुसार त्याने फोन बंद ठेवला आहे. त्यामुळे तपासात अडथळा येत असून, फोन सुरू झाल्यावरच त्याचे नेमके लोकेशन गाठता येईल. दरम्यान वेगवेगळ्या युक्त्यांचा वापर करुन पोलिस कसोशीने त्याचा शोध घेत आहे.

# अपघातातील जखमींवर दीड लाखापर्यंत कॅशलेस उपचार

## गरीब कुटुंबांना मिळणार दिलासा : प्राण वाचविण्यासाठी नवे पाऊल



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१५अमरावती

अपघातातील जखमींना वेळीच उपचार मिळावेत आणि प्राण वाचावेत यासाठी केंद्र सरकारने कॅशलेस उपचार योजना आणली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग आणि परिवहन मंत्रालयाने यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. या योजनेतून देशभरात वाहन अपघातातील जखमींना कोणत्याही रुग्णालयात कॅशलेस उपचार मिळणार आहेत.

अपघातातील जखमींना कॅशलेस उपचार योजना २०२५ नुसार, मान्यताप्राप्त कोणत्याही रुग्णालयात जखमींना दीड लाखांपर्यंत कॅशलेस उपचार मिळणार आहेत. अपघात झालेल्या दिवसापासून सात दिवसाच्या उपचाराचे पैसे मिळणार आहेत. ही योजना ५ मे २०२५ पासून लागू करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जानेवारी २०२५ मध्ये या योजनेची घोषणा केली होती. अंमलबजावणी सुरू झाली आहे.जखमी व्यक्तीला १.५ लाख रुपये दिले जातील. ज्यामुळे अपघाताच्या दिवसापासून पुढील ७ दिवसांसाठी १.५ लाख रुपयांचे मोफत उपचार दिले जातील. जखमींना प्रवेशावेळी कुठलेही शुल्क द्यावे लागणार नाही.

### या रुग्णालयांत उपचार

महाराष्ट्रात अपघातातील जखमींना एक लाखांपर्यंत कॅशलेस उपचार करण्यासंदर्भातील निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. जिल्ह्यातील जिल्हा, उपजिल्हा रुग्णालय तसेच काही खाजगी रुग्णालयात अपघातातील जखमींवर दीड लाखांपर्यंत कॅशलेस उपचार होतील.

### काय आहे केंद्राची योजना?

कॅशलेस उपचार योजनेचा लाभ घेण्याचे तीन टप्पे आहेत. पहिला म्हणजे अपघातानंतर जखमींना हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागेल. केंद्र सरकार या सरकारी हॉस्पिटलची यादी जारी करील. दुसरा म्हणजे अपघातानंतर २४ तासांत पोलिसांना कळवावे लागेल. तिसरा म्हणजे जखमींची फाईल तयार होईल. त्यात पोलिस रिपोर्ट तयार होईल.

# प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी वीस मिनिटांचा अतिरिक्त वेळ मिळणार

## स्तनदा माता विद्यार्थीनींसाठी अमरावती विद्यापीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१५अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने नुकताच एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये स्तनदा माता विद्यार्थीनींना विशेष सुविधा मिळणार आहेत. विद्यापीठाने ७ मे, २०२५ रोजी याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

सदर अधिसूचनेनुसार, ज्या माता आपल्या बाळांना स्तनपान करतात, अशा विद्यार्थीनींना परीक्षेदरम्यान काही प्रमाणात अतिरिक्त वेळ आणि आवश्यक सुविधा पुरविल्या जाणार आहेत. नियमानुसार, परीक्षा सुरू झाल्यानंतर एक तासाने इतर विद्यार्थ्यांना ज्याप्रमाणे खोली सोडण्याची परवानगी दिल्या जाते, त्याचप्रमाणे स्तनदा मातांना त्यांच्या बाळाला स्तनपान करण्यासाठी खोली सोडता येणार आहे. यासाठी त्यांना प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी वीस मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला जाईल. उदाहरणार्थ, जर परीक्षा तीन तासांची असेल, तर स्तनदा मातांना तीन तास आणि वीस मिनिटे मिळतील.

बाळाची काळजी घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थीनीच्या कुटुंबियांची राहील. स्तनपान करण्यासाठी परीक्षा केंद्रावर उपलब्ध असलेल्या स्वतंत्र कक्षात (हिरकणी कक्ष) केवळ स्तनदा



मातांनाच प्रवेश दिला जाईल. बाळासाठी आवश्यक असलेल्या साहित्याव्यतिरिक्त इतर कोणतीही आक्षेपार्ह वस्तू कक्षात आणण्यास मनाई असेल. बाळाला स्तनपान करून परतल्यानंतर, महिला पर्यवेक्षक/परीक्षा प्रमुख/सह-परीक्षा प्रमुख हे त्यांची तपासणी करतील, त्यानंतरच त्यांना परीक्षा हॉलमध्ये प्रवेश दिला जाईल. सर्व स्तनदा मातांना त्यांच्या प्रवेशपत्रिकेवरील आणि उत्तरपत्रिकेवरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य असेल. ही सुविधा केवळ ज्यांच्या बाळांचे वय सहा महिन्यांपेक्षा कमी आहे अशाच स्तनदा माता विद्यार्थीनींना या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील, मात्र सुविधेचा लाभ घेण्यासाठी मातांना बाळाचे जन्म प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

सदर निर्णयामुळे स्तनदा माता विद्यार्थीनींना मोठा दिलासा मिळाला आहे. शिक्षण आणि मातृत्व या दोन्ही जबाबदा-या समर्थपणे पार पाडण्यासाठी सदर निर्णय सहाय्यक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे स्तनदा माता विद्यार्थीनींमध्ये आनंद पसरला असल्याच्या भावना परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी व्यक्त केल्या.

# रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पात बिबट्याचा वावर,कामगारांत भीतीचं वातावरण : वनविभागाची रेस्क्यू टीम दाखल



विदर्भ प्रजासत्ताक
दि. १५ नांदगाव पेठ

नांदगावपेठ येथील पंचतारांकित एमआयडीसीमधील रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पात बिबट्याचा वावर आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. प्रकल्पाच्या मागील प्रवेशद्वाराजवळ बिबट्याचे ठसे आढळले असून, सीसीटीव्ही कॅमेऱ्यातही त्याचे स्पष्ट दर्शन झाले आहे. या घटनेने परिसरातील कामगार आणि स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बुधवारी सायंकाळी काही कामगारांना रस्त्यावर जनावरांच्या पावलांचे ठसे दिसून आले. त्यांनी याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली. यानंतर तपासणीदरम्यान हे ठसे बिबट्याचे असल्याचे स्पष्ट झाले. तत्काळ सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता, बिबट्या प्रकल्पात वावरताना दिसून आला. सुमारे १३५० एकर परिसर असलेल्या या प्रकल्पात बिबट्याला शोधणे हे वनविभागासाठी मोठे आव्हान ठरणार आहे. परिसरात दहशतीचे वातावरण असून, कामगारांनी आपली सुरक्षितता धोक्यात असल्याचे सांगितले आहे. प्राथमिक माहितीनुसार, गुरुवारी दुपारनंतर वनविभागाच्या विशेष टीमने बिबट्याला पकडण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन सुरू केलेले असून परिसरात बिबट असल्याची ठाम माहिती वनविभागाचे कर्मचारी अमोल गावनेर यांनी माध्यमांना दिली. तसेच परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन सुद्धा वनविभागाने केले आहे.सकाळपासून सुरक्षा कर्मचारी सिसिटीव्ही कॅमेरा तसेच प्रत्यक्षरित्या लक्ष ठेवून आहेत. कामगारांमध्ये भीतीचे सावट आहे मात्र वनविभाग आपले कर्तव्य निभावत असल्याने तूर्तास कामगार वर्ग जीव मुठीत घेऊन काम करत आहे.

### एच.आर. मॅनेजरचा उद्धट प्रतिसाद

रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पात बिबट्याचा वावर असल्याच्या बातमीची खातरजमा करण्यासाठी आमच्या प्रतिनिधिंनी कंपनीचे एच.आर. मॅनेजर अनुपम फुलसुंगे यांच्याशी संपर्क साधला. मात्र, अपेक्षित माहिती देण्याऐवजी फुलसुंगे यांनी आमच्याकडे तेव्हढेच कामे नाहीत,आगाऊ कामासाठी आम्हाला फोन नका करत जाऊ असे म्हणत उद्धट स्वरात उत्तर दिले.प्रकल्पाच्या सुरक्षेशी संबंधित गंभीर प्रश्न विचारला असताना एका जबाबदार अधिकाऱ्याची ही बेजबाबदार प्रतिक्रिया अनेक प्रश्न निर्माण करत आहे. स्थानिक प्रशासन आणि कंपनी व्यवस्थापनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी संतप्त कामगारांकडून होत आहे.

